दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोला द्वारा संचालित

# सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला

2020-21

# परिमल

समन्वयक

प्रो. डॉ. कैलास वानखडे

अध्यक्ष - वार्षिकांक सल्लागार समिती

समिती सदस्य

प्रा. सुभाष दामोदर डॉ. भारती पटनायक प्रा. डॉ. कौमुदी बर्डे
डॉ. सुरेशकुमार केसवानी डॉ. उमेश चापके

संपादक

विश्वनाथ लक्ष्मण डोखळे

प्रकाशक

डॉ. आर. डी. सिकची

प्राचार्य

सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला




**स्व. श्रीमती सीताबाई जैन**

# मनोगत



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय हे एक नामवंत महाविद्यालय आहे. या महाविद्यालयामध्ये शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी येथे सर्वकष प्रयत्न केले जातात. या महाविद्यालयाने महाराष्ट्रालाच नव्हे तर या देशाला अनेक मोठमोठे पदाधिकारी दिले आहेत. अनेक कलावंत, राजकारणी, समाजसेवक, वकील, न्यायाधिश दिलेले आहेत आणि आजही हे महाविद्यालय या परंपरेला मोठया आनंदाने कायम पुढे घेऊन जात आहे.

वर्षभर विद्यार्थ्यांसाठी जे उपक्रम राबविले जातात त्याची दखल येथे घेतली जाते. परिमल हा वार्षिकांक म्हणजे विद्यार्थी व शिक्षकांच्या कार्याचा वर्षभराचा लेखाजोखाच असतो. या महाविद्यालयामध्ये क्रियाशिल असलेल्या प्रत्येक विभागांकडून विद्यार्थी हीतासाठी, त्यांच्या सर्वांगिन विकासासाठी जेजे स्पर्धा, कार्यक्रम, उपक्रम आयोजीत केले जातात व विद्यार्थी त्यामध्ये आपले प्राविण्य दर्शवितात त्याची नोंद परिमलमध्ये घेतली जाते.

सत्र 2020-21 मध्ये कोरोना आजाराच्या महाभयंकर प्रलयामुळे महाविद्यालय विद्यार्थ्यांसाठी बंद ठेवावे लागले. अशाही काळात त्यांच्या सृजननिर्मितीला प्रोत्साहन मिळावे म्हणून अशा कठीन प्रसंगातही हा अंक समन्वयक आणि संपादक मंडळाच्या अथक प्रयत्ने आकारास येत आहे याचा मला मनस्वी आनंद होत आहे.

अभ्यासक्रमाच्या व्यतिरिक्त ज्ञानवर्ध, मूल्यवर्धक आणि राष्ट्रप्रेम जागवणारे गुण विद्यार्थ्यांमध्ये रूजावेत त्यांच्या कलागुणांना येथे वाव मिळावा, त्यांच्यामधून जाणकार भावी नगरिक घडावा यासाठी हा अंक महाविद्यालयाकडून छापला जातो.

या अंकासाठी संपादक मंडळ, आणि विशेषतः सल्लागार समिती विशेष प्रयत्न करते. परमिलच्या अंकासाठी हातभार लावणाऱ्या सर्वांचे अभिनंदन आणि पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा.

**डॉ. आर. डी. सिकची**
प्राचार्य
सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, अकोला

# संपादकीय



(समन्वयक-प्रा.डॉ.कैलास वानखडे)

सीताबाई कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय हे विदर्भातील एक नामांकित आणि सर्व सोयींनी सुसज्ज आहे. 1935 पासून सेवेत असलेल्या या महाविद्यालयाने असंख्य विद्यार्थी घडवले आहेत. विद्यापीठीय गुणवत्येची परंपरा आजही कायम ठेवली आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासोबतच त्यांच्या सर्वांगीण विकासाची जडणघडण येथे केली जाते. विद्यार्थ्यांचे कलागुण विकसित करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. संपूर्ण सत्रात जे काही उपक्रम आयोजित केले जातात त्याचा लेखाजोखा "परिमल" मध्ये जतन केले जाते.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत झळकणारे गुणवंत विद्यार्थी, सांस्कृतिक विभाग, एन सी सी, एन एस एस, क्रीडा विभागातील प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांच्या उपलब्धीची नोंद या वार्षिकांकात आवर्जून घेतली जाते. परिमल हा अंक म्हणजे विद्यार्थ्यांचे लेखन प्रकाशनाचे हक्काचे ठिकाण आहे. कवी, साहित्यिक असलेल्या विद्यार्थ्यांची जडणघडण सुदृढ व्हावी हाच या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे.

सत्र 2020-21 हे कोरोना आजाराच्या महाभयंकर प्रसारामुळे फारच दुर्दैवी ठरले आहे. शैक्षणिक संस्था ठप्प झाल्या होत्या. महाविद्यालये बंद ठेवावी लागली होती. विद्यार्थ्यांना वर्गात शिकवायची बंदी करण्यात आली होती. शिकवणी सुद्धा ऑनलाईन द्यावी लागली होती. काही वर्गांना तर परीक्षेविनाच पुढच्या सत्रात ढकलले होते. जवळपास चवदा पंधरा महिने सतत लॉकडाऊन लागले होते. त्यामुळे विद्यार्थी अभ्यासाव्यतिरिक्त कोणत्याही इतर कार्यक्रमात, स्पर्धेत सहभागी होऊ शकले नाहीत. त्यामुळे या अंकात इतर कोणतेही कार्यक्रम समाविष्ट करू शकलो नाही पण काव्य लेखनास किंवा त्यांच्या प्रतिभा आविष्कारास या अंकात जागा देऊन हा अंक साकार होत आहे याचा मनस्वी आनंद होत आहे.


**संपादक मंडळ**













# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

## गुणवत्ता यादी - सत्र 2020-21

### मराठी विभाग


मनोज भगत-आठवा मेरिट


वैशाली खांडवाये -आठवी मेरिट

### समाजशास्त्र विभाग


सुषमा डोंगरे- तिसरी मेरिट


नूतन थोरात- नववी मेरिट

### इतिहास विभाग


राजू वानखडे - सातवा मेरिट


सचिन इंगोले - नववा मेरिट

### संगीत विभाग


नीता जाधव - दुसरी मेरिट

# अनुक्रम

## मराठी विभाग

### कविता


ग्रामपंचायत निवडणुक - अंकित वानखडे - 8
!! व्यर्थता !! - Kajal jawake - 8
आधुनिक सरस्वती - कु.मानसी भगत - 9
मुजरा मानाचा शाहीराचा - मनोज भगत -9
कोरोना - कैलास वानखडे - 10
मन मोहरले - अनिकेत इगळे - 11
महिला - शुभम इंगळे - 11
चिंब भिजावे - शुभम इंगळे - 12
स्वप्नातील अबोल मन - प्रभावती चोपडे -12
उन्हाळ्यातील दुपार... - प्रभावती चोपडे - 12
अपयशाचे स्वागत - करण इंगळे - 12
यश..... - मयुरी गिरी - 13
कष्टाचे तुकडे - साक्षी दुबे -13
" तू " - दर्शना सुशीर - 13
माझे मन - मयुरी गिरी - 14
"माय" - Kajal jawake - 14
आत्मबल - पूजा पारीसे - 14
हे सत्य शोधकां...! - पूजा पारीसे - 14
गुरु - राणी विखे - 15
स्त्री-पुरुष समानता - राणी विखे - 15
सुंदर वसुंधरा - अस्मिता घनबहादूर - 16
काळ - अस्मिता घनबहादूर - 16
मैत्री - एम.जी ढोरे - 16
शिक्षक म्हणजे - दिपाली मोहोड - 16
आई म्हणजेच - दिपाली मोहोड - 17
कोरोना - कविता पांगसे - 17
शेतामधील तणकट - विक्रम पांडे - 17
शाळामाय - कल्याणी बाजड - 18
आई-बाबा - कविता पांगसे - 18
शिक्षा - अस्मिता घनबहादूर - 19
पर्यावरणाचा -हास - वैष्णवी बाजड - 19
जीवन - वैष्णवी बाजड - 19
पाऊस - योगिता जुमळे - 20
आई - रविना मोहन चव्हाण - 20
जरा जगुन बघा.. - योगिता जुमळे - 20
का गं आई - भाग्यश्री चक्रणारायन - 21
मन - अ .वि. सरकटे - 21
कर्तव्याची दोरी - अ.वि.सरकटे - 22
मैत्री - रविना चव्हाण - 22
भावनाचा ओलावा... - दिपती बाजड - 22
प्रेम - मधू हातोलकर - 23
पहिला पाऊस - शिवम कुळकर्णी - 23
आई... - वैशाली खोब्रागडे - 23
तो फक्त बाप असतो - योगेश पवार - 24
**कष्टाची वाट** - धिरज खंडारे - 24
**निवांत** - धिरज खंडारे - 25
**संवाद पाण्याशी** - राजरत्न गायकवाड - 25


### लेख


आता तरी ... - विशवनाथ डोखळे - 26
लग्न एक करार - दर्शना सुशीर - 28
मी आहे ना••• - मयुरी गिरी - 29
वृद्धाश्रमांची गरज का? - राणी विखे - 29
मरण पेरावं... - Satish Chakranarayan - 30
वाचनसंस्कृती : एक अनुबंध - राणी गावंडे - 33
आता उगारायलाचं... - मनोज भगत - 34
जातीभेद - मधुसूदन गो. ढोरे - 36
जग हे विश्वावर चालतं ...! - पूजा परिशे - 36
पर्यावरण - योगिता जुमळे - 38

आयुष्यातील वडिलांची...- अर्पिता काळकोंडे - 38
माहिती तंत्रज्ञान... - मोनिष चौबे - 40
ऑनलाईन शिक्षण... - वैशाली खोब्रागडे - 42
ब्रेक्स - धिरज खंडारे - 44

## हिंदी विभाग

**लेख**

एक स्वस्थ् व्यक्ति ... - रेणु जांगिड़ - 44

**कथा**

हालात - मानसी अजित काळकोंडे - 45

## संस्कृत विभाग

**लेख**

**कालिदासमेघदूते...** पूजा संजय सरदार - 48
**जीवने व्यायामस्य** ... - अर्थव जोशी - 49
तस्मै श्रीगुरवे नमः - मनिषा जांभूळकर - 49
**सर्वे गुणाः** ... - **पुनम सुशिर** - 50
**डॉ. बाबासाहेब** ... - **जीवन मुंडले** - 50

## इंग्रजी विभाग

**कविता**

**Originator**- Asmita Ghanbahadur **- 51**
**Transient** - Asmita Ghanbahadur - 51
**Cease prejudices** - Samrin Khan - 52

**लेख**

**The Importance of Literature to Humanity -** Anand Umesh Karodade - 52
**Women's empowerment** - Sheikh Mohammad Mujammil - 54
**Educating The Girl Child -** Gayatri R. Tiwar - 55

वार्षिक अहवाल - **58**
**Foto - 64**

**कविता**

**ग्रामपंचायत निवडणुक**

ग्रामपंचायतच्या निवडणुकीच,
अस काम आल रंगात
निवडुन यायच भुत घुसल,
ज्याच्या त्याच्या अंगात

अस वाटते जस
लोकसभेच हाय इलेक्शन
मतदाराले पडला विचार
कोणाच कराव सिलेक्शन

प्रचार करतांना उमेदवार
लय असते पावरात
पाटर्या सुरू असतात
उमेदवाराच्या वावरात

कोन येईल निवडुन
कोनाच येईल पॅनल
ते तर मतदारच ठरवतील
कोनत लावाव चॅनल

मागच्या आपल्या कामाचा
लोक करतात विचार
कोण्याही उमेदवाराचा
खरा तोच असते प्रचार

घराणे, धर्म, जातीच्या
पलीकडचं व्हाव राजकारण
प्रत्यक्ष लोकशाहीच
ज्यान टळु शकेल मरण

परिस्थिती झाली मे महीन्यातल्या
उन्हापेक्षाही भकास
कोणीही निवडुन या पण
करा गावाचा विकास.......

अंकित राजेंद्र वानखडे,
एम. ए. द्वितीय वर्ष ( अर्थशास्त्र )
========================

**!! व्यर्थता !!** .

स्वप्नांच्या झुल्यावर,
एक झुला झुलला होता,
नकळतच त्याचा ही,
एक खिळा उखळला होता..

घरटे बांधया मि
जो दोर पकडला होता
तो दोर हातातून
कंव्हाच निसटला होता...
ते वादळ आयुष्याचे
बरेच शिकवून गेले
तोवर अनुभवांनी माझा
हात पकडला होता.
ते स्वप्न फसवे होते,
की झुला फसवा होता....
या प्रश्नांनी माझा,
श्वास कोंडला होता...
ते उत्तरं आयुष्याचे
मला बेजार करून गेले
तोवर मरणाने माझा
हात पकडला होता.
ते स्वप्न फसवे नव्हते,
न तो झुला फसवा होता..
बस संपून यात्रा माझी,
मी मार्ग बदलला होता...
ते जीवन जगण्याचे

मी कैफ बहाणे केले ...
तोवर अग्नी ने माझा
देह जळला होता...
या अपूर्ण कहाणीची
पूर्तता करेल कोणी
बसवेल तो खिळा
जो काल निखळला होता...

Kajal jawake
MA 1(year) English

========================

**आधुनिक सरस्वती**

ईसरली काव तू
आज काय हाय...
नसनं लक्षात राहत
तं कॅलेंडर पाय व माय.....

जयंती हाय
सावित्रीबाईंची माया...
हे ईसरुनं सगळं
काम जाईनं वं माय वाया....

तुह्यासाठी जिंन
शिक्षणाची दारे केली खुले....
ती म्हनजे तुम्हच्या सर्वांची माय
सावित्रीबाई फुले...

तुह्यासाठी तिनं
झेलले दगड,शेन,गोटे....
अन् तू शिक्षणाचा बायना करुन
पराक्रम करतं मोट- मोटे....

सावित्रीची लेक तू
जराशिक पुस्तकात वाकुनं पाय...
समतेची समई तू
घरात लावत जायवं माय....

जिंन आपल्या हातात
देल्ली लेखनं अन् पाटी....
तिले ईसरुनं तू
जाऊ नको हिरोईनच्या वाटी....

आजचं तुले आठवली कावं
सावित्रीबाई फुले माई....
नाहीतनं रोजचं तं टाकत असतं
स्टेट्स वर काहीच्या काई ....

जे पुस्तकातले ईचार
वास्तवात आणतें....
मले तं बाई
तिच्यातं सरस्वती दिसतें....

बाईची जात तू ,
उपकार ज्योती-सावित्रीचे मानत जाय....
पेटती मशाल तू....
आग संसारात नाई...
शिक्षणात लावत जाय......

कु.मानसी संजय भगत
(इयत्ता १२वी,कला)

========================

**मुजरा मानाचा शाहीराचा**
*संभाजी राजे यांचा पोवाडा*

मुजरा मानाचा शाहीराचा
महाराष्ट्रभु शिवरायाला!.....
घडविले त्यांनी संभाजीला
असा तो धर्मवीर होऊन गेला हो जी जी जीरहा जी....

जबड्यात घालुनी हात...
मोजले त्याने वाघाचे दात

धरतीवर आला नरवीर जी जीरहा जी..

घडविला मोठा पराक्रम
यवनांची झाली क्रमवार घसरणं
औरंगजेब थरा-थर भ्यायचा हो जी जी जी जीरहा जी....

दौलत खान फौज घेऊन आला
संभाजीचा नकळत घात केला..
नावडी नदीजवळ राजा जेरबंद झाला..
तरी यवन पळे बाजु बाजुला...

संभाजी दरबारात केला हजर
यवनांनी नाही केली हो...कदर
जखडीले साखळदंडानं.
यवनांची यशस्वी झाली हो चाल.जी जीरहा जीरह जी....

नमला नाही औरंजेबा मोरं
औरंगजेब होता दरबारी शिरजोर
मराठी मातीच्या नरसिंहाचं हे पोरं
कारण स्वराज्य अस्मितेचं होतं बळ..
जी जीरहा जीरह जी...

जखडीले साखळदंडानं
त्यांना होतं काट्याचा कुंपनं
अंगाची होत होती फार अगीनं
तरी संभाजी होता ताठ मानेनं जी
जीरहा जीरह जी...

औरंगजेब बोलला राजदरबारी
आखिर आगया दख्खन का चूहा
शिकंजे मी लय भारी!...
नजर नीचे कर संभा ऐसा बोलला राजदरबारी...
बोलला कवी कलश

राजा है वो झुकने वालो मे से नही
व झुकानेवालो मे से है...
खामोश.....

संभाजी चे रूप पाहून....
थरथरली सारी जणं
तम - तप्त सलाखा समोर पाहून
स्मरण करतो आईसाहेब, शिवाजीला.
डोळ्यात टाकल्या सलाखा हो जी जीरहा जीरह जी.....

चहुकडे झाला महाकल्लोळ
संभाजी विव्हळत होता फार जोर-जोर
औरंगजेब हसतो फार जोर-जोर
तरी यवनं नाही झाला हो बहाद्दर.. जी जीरहा जीरह जी....

चहूबाजूने जन्मले सेवेकरी
तोंड उघडण्याची केली भारी तयारी
संभाजींची जीप कापण्यात आली
रक्ताची चिळकांडी निघाली.हो जी जीरहा जीरह जी...

चाळीस दिवस अमानुष छळ
काढता येईना तेथून पळ..
नेत्र जीवा केल्या त्यांच्यापासून दूर दूर
तरी औरंगजेब संभाजी पासून पळतो दूर दूर..

निघाला एक्केचाळीसावा दिवस
संभाजींचा केला शिरच्छेद...
असा तो धर्मधुरंधर होऊन गेला हो जीरहा जीरह जी....

मुजरा मानाचा
शाहिराचा....जय शंभुराजे
मनोज संजय भगत, अकोला

========================

**कोरोना**

कोरोना म्हणजे
मनातील प्रचंड भीती
देह अन पैश्याची क्षती

कोरोना म्हणजे पदरमोड
जीवाची मोडतोड

कोरोना म्हणजे
दागिन्यांची वीकटिक
आप्तांची पायपीट
पोळी शेकायचा तवा
शोषणाचा पयत्रा नवा

कोरोना म्हणजे
आसवांचा महापूर
जगभर सर्वदूर
डॉक्टरची चांदी
सेंटर्सची सुगी

कोरोना म्हणजे
रुंगयला लागट ताप
फोफसाला चिटकला शेम्बूड
घशाची खरखर
नाकाची फरफर

कोरोना म्हणजे
होत नाही तोवर गम्मत
झाल्यावर अच्छकाची दुम्मत
जो ठेवते हिंमत
त्याचीच होते किंमत.

कैलास वानखडे
========================

**मन मोहरले**

मन मोहरले
जरा बावरले
थोडे आतुरले
झाले धूंद धूंद
बेधूंद मिलनासाठी | .

ओझरले  नेत्र
पहूडले गात्र
उलटली रात्र
मन सुप्त झाले
तृप्त तूझ्या ओठी|

मनाचा गहिवर
अश्रु गालांवर
झरले झरझर
दू:ख ना अंत
तूझी खंत फूलण्यासाठी|........

अनिकेत बाबूराव इगळे .
B.A scound year
========================

**महिला**
ती आहे एक महिला,
ती आहे एक आई,
ती आहे एक बहिण,
आणि
तिच आहे जिच्यामुळे सर्वांना जीवन
मिळते
तिच एक महिला आहे,
जी सर्व नाते जोडून ठेवते,
ती एक महिला आहे,
ती आहे म्हणून;
हे सारे विश्व आहे,
ती आहे म्हणून;
सारे घरे आहेत,
ती आहे म्हणून;
नाते आहे
आणि
ती आहे म्हणून;
केवळ नात्यात प्रेम कायम आहे
शुभम इंगळे
MA economics 3rd semester
========================

**चिंब भिजावे**

मी चिंब भिजावे पाऊसाच्या
त्या पहिल्या धारा त
मी चिंब भिजावे माझ्या मनात
जणू काही मोर भिजतात राणा वनात
पाऊसाची ती पहिली धारा
मन मोहून घे ती समुद्राच्या त्या सुंदर लहरा
मी चिंब भिजावे माझ्या मनात
मी भिजावे माझ्या मनाच्या विचारात
पाऊसाच्या त्या पहिल्या धारा त
चिंब भिजवून माझे अंग
करतो मी सर्वांना दंग
पाऊसाच्या त्या बरस ती धारा
बहरला तो फळा फुलांचा मळा
सोबतीला वीज तुफान वारा
काय लिहावे आता पुढे कळत नाही मला
म्हणून थांबून विश्रांती देतो मी स्वतःला

शुभम इंगळे
MA economics 3rd semester
========================

**स्वप्नातील अबोल मन**

अशीच यावी वेळ एकदा
स्वप्नी देखील नसतानां....
असे घडावे अवचित काही
समीप तु असतानां...
संकोचाचे रेशीम परदे
हा हा म्हणता असे विरावे,
समय सरावा मंद गतीने
अन प्रीतीचे सूर जुळावे.....

प्रभावती विठ्ठल चोपडे, निंबा.
एम. ए. मराठी. (प्रथम वर्ष प्रथम)
========================

**उन्हाळ्यातील दुपार...**

फक्त तुझ्यासाठी...
एकदाच....एकदाच....
संध्याकाळी पश्चिमेच्या क्षितीजाकडे
तन्मयतेने बघ,
धुसर होत चाललेल्या
क्षितिजावर मावळणाऱ्या
क्षितिजाची लालबुंद
कड तुला दिसेल,
त्याही पलीकडे बघण्याचा प्रयत्न कर
झाकलेल्या क्षितिजावर
तुला माझं अस्तित्व जाणवेल.
एकदाच... एकदा...

प्रभावती विठ्ठल चोपडे , निंबा.
एम. ए.मराठी (प्रथम वर्ष)
========================

**अपयशाचे स्वागत**

या अपयशांनो या समस्यांनो
मी तुमचे स्वागत करतो,
अरे माझा जन्मच समस्येतून झालाय
मी कशाला घाबरतो..

येऊ दे अपयश कितीही
आता मी भिणारा नाही,
अपयशाच्या लाटेत मी
कधीच वाहून जाणारा नाही..

कितीही अपयश आले तरी
मी प्रयत्न सोडणारा नाही,
विश्वासाने तोंड देईन
जरा ही डगमगणारा नाही..

बारा हत्तीच बळ माझं

त्या अपयशातून जाण्याचं,
केवढं असेल रे अपयशा तुझं
अस्तित्व मोहरीच्या दाण्याचं..

अपयशाची पर्वा मी
कधीच करणारा नाही,
मी राखेतून झेप घेणारा
मी कधीच मरणारा नाही..

असेल हिम्मत तर
रोखून दाखव हे अपयशा मला,
यशासाठी छाटून टाकील
येणारी प्रत्येक बला..

अरे अपयशा सत्याला
कधीच येत नसत मरण,
उद्याचा दिवस माझाच असेल
ठासून सांगतोय हा कणखर करण..

करण दुर्योधन इंगळे
एम. ए. द्वितीय वर्ष (अर्थशास्त्र)

========================

**यश.....**

शोधु नको बाहेर तू
यशाची चावी आहे तुझ्या हाती

पराजयही तुझ्यामुळेच होईल
थोपवू नको दुस-याच्या माथी

स्वीकार कर संकटांचा
लढून त्यांच्यावर मात कर

सोड आता पराजयाची चिंता
तू फक्त जिंकायची बात कर

मयुरी विलास गिरी
M.A. {1 Year}

**कष्टाचे तुकडे**

कष्टाचे तुकडे तोडुन
गेला कुठरे सोडुन
बघ रडते तुझी आई
धडपडते तुझी ताई

होते ते आपले
म्हणनारे सारे खोटे
गेला तु सोडुन ते ही गेले
भेट ना पुन्हा बनऊ नवीन संसार

घेरे आयुष्य उसने
परत भेटु राना
बोलु आनंदाची गाणी
छत घेऊरे डोक्याला
घेऊ पायाला बुट
बसुन अंगनात
बोलुरे गोळ बोल
परत भेटीन आयुष्य
तर फोडीन सारे बोल.

साक्षी गजाधर दुबे
बि ए भाग : - 2

========================

**" तू "**

मोहरल्या मातीतले अत्तर तू
देहातल्या कवितेचे अक्षर तू
माझ्या मनी गुंतलेले,
असे तुझे मन
जिथे जिथे जावे तिथे तुझी आठवण
कु. दर्शना बळीराम सुशीर
एम.ए अर्थशास्त्र भाग २

========================

**माझे मन**

थांबावंस वाटत मला
एखाद्या ठिकाणावर आणि
मनातलं ओझ ठेवावं
एका भक्कम दगडावर•••

माझा विश्राम असावा
एखाद्या स्थिर काठावर,
सुखद क्षणांनी गर्दी करावी
मनाच्या मोहक क्षितीजावर•••

समाधानाच मृगजळ सापडावं
त्या शांत किना-यावर,
अशांत झालेल्या मनाला
सोडावं संथ पाण्यावर...

मयुरी विलास गिरी
M.A. { I Year}

========================

**"माय"**

गेले सुखाचे दिवस दुखः सोसवेना डोळा,
जीव व्याकूळ व्याकूळ कुठं मिळेल विसावा..,
अख्खी हयात सरली खळगी पोटाची भराया,
जीव थकला कंव्हा नेशी रामराया..!
पाखरं कुशीत घेऊन 'माय' शोधते निवारा..,
पेटलेल्या रानाचा ह्यो आता सोसवेना वारा..,
जव्हा काहूर काहूर मनी तिच्या ग ह्यो उठे..,
रडता ' माय ' माझी काळीज आभाळच फाटे..!
सरी बरस बरसती जशी समिदराची लाट..,
जिथं उभी माझी ' माय' तिथं देवाचा काय थाट..,
जन्मो जन्मी तू मिळावी हेच मागणं रे देवा..,
पुढचा जन्म माझा तुझ्या कुशीतून व्हावा...!

Kajal jawake
MA ( 1 year) English

**आत्मबल**

( गुरफडलेली स्त्री आत्मबल
एकवटून सगळ्यांचा धिक्कार करतांना )

नको ते आयुष्य जे गुंफल असेल काट्यांनी
नको ते जीवन जेणे होरपडेल अग्नी

नको ती वर्षा जी निसर्गालाच लाथाडेल
नको ती भूक जी गुलामगिरीतून भागेल

नको ती आशा जीचा अंत ना उदय
नको जगण्याची अभिलाषा ज्यात नित मरणाचा भय

जगणं ते कसलं किडा मुंगी मकोड्याचं
चिरडून टाकेल कुणीही, मोल ना कश्याच

नको ती वाट जी दास्यत्वाने नावाजली असेल
नको तो शिखर ज्याला कोलमडण्याची भीती असेल

नको तो शिखर जो तृष्णा भगवेना कुणाची
जरी असली क्षमता त्यात नद्या कितीही साठवण्याची

धिक्कार त्या जगण्याचा ज्यात घुटमळतोय प्राण
जगणं असावं इतिहासाचं ज्याचे प्रसिद्धीचे गाण

पूजा पारीसे
MA II year

========================

**हे सत्य शोधकां...!**

हे सत्य शोधका..!
तू शोधून शोधून काय शोधलेस
माणुसकीला अमानुष वागणूक
तेव्हाही होती आजही आहे
तिच्या विश्वासाला तडा तेव्हाही गेला नी आजही जातोय
हे सत्य शोध का..!

आमच्या सत्याला कोठडी तेव्हाही होती, आजही आहे,
सत्याचे पुरावे असतात कोरटापर्यंत,
नंतर बिथ रतात कुटल्यातरी वाऱ्याने,
नी फिरतात प्रतीपक्षाकडे....
हे सत्य शोध का.....!
तुम्ही समाजाला नावीन्य आणलेत,
समतेचे कायदे केलेत
परंतु ;
गरिबाला नीवाला तेव्हाही नव्हता, आजही नाहीये
हे सत्य शोध का....!
आम्ही ठोठावली दारे भल्याभल्यांची
परंतु ;
न्याय आंधळा तेव्हाही होता, आजही आहे
हे सत्य शोध का......!
ते पांघरतात शाल, दया, क्षमा शांतीची
परंतु ;
चोर सोडून संन्याशाला फाशी, तेव्हाही होती, आजही आहे

पूजा पारीसे
MA II year
========================

**गुरु**

गुरु आणि शिष्याचं
नातं असतं विश्वासाचं
जस माय लेकराचं
नात असत मायेचं

एकलव्यासारखा शिष्य
असावा निष्ठावान
जो गुरुदक्षिणा देतांना
विसरुन जाईल भान

मार्ग दाखवणारा गुरु
प्रत्येकालाच लाभतो
जाणिव होते त्यालाच
जो नम्रतेने वागतो

गुरुविषयी काय लिहावं
जेवढं लिहाल तेवढं कमी
गुरुशिवाय पर्याय नाही
एवढी देते हमी

आम्हासही लाभले गुरु
असेच महान
त्यांच्या आशीर्वादाने
होऊ आम्ही विद्ववान

परमेश्वराचे रूप मानुन
गुरुला वंदूया
त्यांचा आदर्श घेऊन
आपले जीवन घडवूया

कु. राणी पांडुरंग विखे
एम.ए.( मराठी) भाग- 2
========================

**स्त्री-पुरुष समानता**

स्त्री-पुरुष समानता
आहे म्हणता समाजात
मग कावुन सगळे बंधन
स्त्रीलेच पाळा लागतात

लग्नाची खून म्हणून
मंगळसूत्र तिनच घालावं
नवऱ्याच्या नावाचं कुंकू
बी तिनंच लावावं

नवरा मेला तर हिनं
विधवा होऊन जगावं
त्याची बायको मेली
तर त्यानं मोकाट व्हावं

पोरगी झाली तर तिले
पोटातच मारतात
अन पोरग झालं तर
वाजत गाजत आणतात

कायत म्हणता तुम्ही
स्त्री-पुरुष समानता हाये
अजून राजेहो आपला
देश लय माग हा

कु. राणी पांडुरंग विखे
एम.ए.( मराठी) भाग- 2
========================

**सुंदर वसुंधरा**

श्रृष्ठी च सौंदर्य आहे हे पर्यावरण
माय बापा सारखे याचे आपल्यावर आवरण
जीवनावश्यक याचा एक एक घटक
पण याची परिस्थिती झाली आहे विकट
मोठमोठ्या फॅक्ट्रयांच्या गंदग्यां मुळे
दुशीत झाले नदी, नाले आणि तळे
अवकाशातील ही ओझोन लेयर
आता तरी करा तीची केयर
जंगल उध्वस्त नका करू
पक्षी, प्राण्यांचा सहारा आहेत हे तरू
आळा घाला ग्लोबलवाॅर्मींगला
सुंदर बनवा प्रत्येक मॉर्निंगला
मानवांनो आता तरी सुधरा
मगच सुंदर होइल वसुंधरा!

अस्मिता अरूण घनबहादूर
BA 2nd year

**काळ**

काळाच हे पाणी, वाहे जसे मधुर वाणी
महत्त्व कळता क्षणी , होई प्रगत तो धनी
संधी देई तो प्रत्येक पदरी
उपयोजिता वेळी होई दुर नादारी
गेला तो काळ येईना वापस
संगे नेई जीवनाचा सारा रस
सतर्कता काळाची बनवी जिवन उत्कृष्ट
परदा आळसाचा बनवी वेळेस निकृष्ट.

अस्मिता अरूण घनबहादूर
वर्ग - BA 2nd year
========================

**मैत्री**

मैत्री असावी जीवाभावाची
नुसतीच नको नावाची असावा आदर करावी कदर
कोणत्याच नको अपेक्षा मैत्रीच्या कधीचसंपू नये कक्षा
असावी निष्पाप वृत्ती मैत्रिणीच पेटवू स्नेहाची ज्योती.

एम.जी ढोरे
एम.ए. 2

========================

**शिक्षक म्हणजे**

आयुष्याला कलाटणी देणारी प्रेरणा
ध्येयासाठी मार्ग दाखवणारी दिशा
कधी बिकट परिस्थितीत प्रेमाची साथ
तर कधी पाठीवरील शाबासकीचा हाथ
कधी कौतकाचे गोड शब्द तर कधी हातावर
बसवणारा छडीचा मार

शिक्षक म्हणजे

चांगले संस्कार करणारी मूर्ती
संकटकाळात धैर्य देणारी स्फूर्ती
चारित्र्य पूर्ण विद्यार्थी घडवणारा शिल्पकार
जादूची छडी जी करते विद्यार्थ्यांचे स्वप्ने साकार

शिक्षक म्हणजे
सखोल मूलभूत ज्ञानाचे भांडार
दूर करी जीवनातील अज्ञानमय अंधार
अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारी तलवार
अनुभवातून निर्माण होणारा साक्षात्कार असे हे शिक्षकाचे
आजन्म न फिठणारे उपकार

दिपाली सज्जन मोहोड
एम. ए मराठी भाग - 2
========================

**आई म्हणजेच**

आई म्हणजेच साक्षात
भगवंत परमेश्वर असतो.
आणि
त्या परमेश्वरा पर्यंत पोहचविणारा
वडील एक संत असतो.
आई म्हणजे
तुमचे शरीर , मेंदू ,हृदय
आणि मन असत
आणि
वडील हे भक्कम ठेवणारा पाठीचा कणा
आणि
शरीरातल हाड अन हाड असत...

दिपाली सज्जन मोहोड
एम. ए मराठी
========================

**कोरोना**

कोरोनाची दहशत आहे घराघरात ,
कधी येतील ते आनंदाचे क्षण पुन्हा जीवनात,
सामान्य माणूस बसला आहे घरादारात,
कधी पडेल त्याच्या चार घास पोटात,
निमित्त कोरोनाचे -
पण रोज रोज मरणे पडले पदरात,
रोज रिकामी असते गरिबांची परात,
मंग बरे नाही वाटत का ते गर्भस्थ शिशु आईच्या उदरात,
ना काही चिंता वा भीती त्याच्या मनात,
बळीराजा कष्टतो राबतो रानात,
चार घास भाकर घेऊन खातो हातात,
कष्टाच्या त्या पाठीवरच्या खुणा दिसे उन्हात,
तो राबतो कष्टतो म्हणून अन्न पडते आपल्या पोटात,
देवा.......
दाखव चमत्कार आणि नष्ट कर कोरोणा क्षणात,
प्रत्येक जन आहे सध्या अंधारात,
कारण.... कोरोणाची दहशत आहे घराघरात

कु. कविता गजानन पांगसे
एम. ए. मराठी भाग २
========================

**शेतामधील तणकट**

तो किती किती प्रयत्न करतो:
उन्हाळ्यात लोखंडी नांगर
चालवला पावसाळ्यात लाकडी ,मग वखर,
मग बायांची खुरपी.....पान शेतातल तणकट जात नाहीB
पिकाची मान आवळून धरत साल .
विषारी द्रव्याची फवारणी केली तकट जात नाही.
तो
वेडावल्या सारखा होतो.

बचकबचक तळहात सोलवटेस्तोवर उपटत
राहतो.तणकट जात नाही.
शेवटी तो
निष्कर्षप्रत येतो की
या मातीतील टणकट जात नाही
जाणार नाही
आता तो
फक्त गच्च डोकं धरून बसतो.
मेंदूत तणकटाच बी पडू नये म्हणून आटोकाट प्रयत्न
करतो..

विक्रम पंढरी पांडे
एम.ए.मराठी भाग-२
========================

**शाळामाय**

वाट बघते लेकरांची
तुमची ही शाळामाय
झाली अशी ताटातूट
जशी वासराविना गाय

येतो आवाज तो कानी
तुमच्या गोंधळाची आस
लेकरांनो तुमच्या येण्याचा
होतो रोजच मला भास

परिपाठाची ती लगबग
मला दिसते अजून
प्रार्थनेच्या सुरामध्ये
मी जायचे भिजून

नाही खेळाचा तो तास
झाले मैदान रे सुने
लेकरांनो तुमच्याविना
वाटे मला सारे उणे

दुपारचा तो खाऊ
गोड दिसे ती पंगत
मी अजूनही उपाशी
तुमची तुटली रे संगत

बाळांनो तुमच्याविना
नाही करमत आता
येतो परत लवकरी
गेलात सांगुनी जाता जाता

महाभयंकर हा रोग
आला रे कुठून
आपली माय लेकरांची
माया चालली रे आटुन

आता म्हणे ऑनलाईन
भरतो तुमचा तास
इथल्यासारखं तिथे
वाटतं का काही खास?

मिटो लवकरच
रोगांच्या या लाटा
सापडो लेकरांना पुन्हा
शाळेच्या सुंदर वाटा.......

कल्याणी अरूनराव बाजड
एम. ए.(मराठी) भाग -२
========================

**आई-बाबा**

कुणी म्हणे माय कुणी म्हणे आई,
जीवनातले कुठलेच दुःख कुशीत तिच्या नाही,
ओंजावरुन गोंजारून जेव्हा ती थोपटते,
स्वर्गातले सारे सुख माझ्याच नशिबी आले वाटते,
आई दुधावरची साय तर बाबा अदृश्य लोणी,
उपकार कोटी कोटी कारण जग दाखवलं त्यांनी ,
जीव त्यांचा सारा
त्यांच्या चीलापिलात असतो,

मग त्याच पिलांना
त्यांच्यासाठी वृद्धाश्रम का भासतो?
आई बाबा असतात
जन्माची शिदोरी,
मग वृद्धाश्रमात टाकने
हे नाही का अघोरी,
आई बाबा म्हणजे
अनमोल छाया
अनमोल माया
उपकार फेड लेका
नाहीतर जन्म जाईल वाया.

कु. कविता गजानन पांगसे
एम. ए. मराठी भाग २

=========================

**शिक्षा**

जिंदगी मे कामयाब है बनना
तो इसे कम ना समझना
करे जो शिक्षा को हासिल
मिले उसे उसकी मंजिल
शिक्षा से बेहतरीन हो
शिक्षा है बोहत अनमोल
बिना इसके बिघडे जिवनका तोल
ती है जिंदगी
समाज से हटती है गंदगी
शिक्षित व्यक्ति रहे हमेशा आगे
सारी दुनिया उसके पिछे भागे !
अस्मिता अरूण घनबहादूर
वर्ग - BA 2nd

=========================

**पर्यावरणाचा -हास**

एक झाड लावू प्रगतीकडे जावू
वक्षतोड थांबवू पर्यावरण वाचवू
कमी करू धुर पाऊस पडेल भरपुर
प्रदुषण थांबवू हरितक्रांती घडवू

स्वविकास जेवढा महत्वाचा
तेवढेच महत्व भुमीविकासास देवू
प्रत्येकजण पाऊल आपले जरासे जपून ठेवू
सृष्टी होईल प्रसन्न याच्याकडेही पाहु

झाडांना घालू पाणी
त्यांनाही जीवनदान देवू
मधुर रसाळ फळे आपण
सर्वच जण खावू

नाहक प्रदुषण तर नकाच करू
वन्यजीवांना ही अभय देवु
पर्यावरण आपले दैवत मानु
पर्यावरणाचा -हास एकजुटीने रोखू
वैष्णवी बाजड
एम.ए भाग २ मराठी .

=========================

**जीवन.........**

पहाटेस फिरता फिरता
अवचित नजर पडली
सलाम तुला हे फुला,
तुझी जगण्याची जिद्द मी पहिली.

नाही स्थल नाही जल
सारीकडे पाषाण अन धूल
परी फुलणारे तुझे जीवन,
मला काहीतरी सांगून गेले.

उद्याची काय बात करावी
आजचे जीवन जगून घ्यावे
पण तुझे हे जगण्याचे गाणे,
मला जीवन तराणे शिकवून गेले.

मित्रानो,
पुन्हा एकवार या फुलास माझा सलाम,

त्याने जगण्याची,
फुलण्याची जिद्द दाखवली,
या कठीण अन बिकट परिस्थितीतही.......
वैष्णवी बाजड
एम.ए मराठी भाग २......
========================

**पाऊस.**

मृग नक्षत्रआले चला
करूया तयारी पेरणीची
कसं बसं उधार ऊसणे पैशांनी
घेतो शेतकरी बी बिजवाई
आहे त्याला काळजी संसाराची
धडपड करतो बिचारा दिवस रात्रीची
कसा निसर्ग कोपतो दरवर्षीची
रोप उगवतं वाट बघते वर्षाची
एकदा पाऊस सुरू होईल
रोपाचे रूपांतर झाडाझुडपात होईल
ही भोळी आशा आहे शेतकऱ्याची
किमया आहे सर्व मृग नक्षत्राची
शेवटी वरून राजा बरसेल नक्की
तला शेतक्री राजाचं मन नसेल दुःखी...

योगिता जुमळे
एम.ए.भाग२
========================

**आई...**

जीव चेतना घेऊनी
तान्हया पाऊलाने येतो
धन्य मातेच्या कृपेने
या विश्वाला पाहतो ,

देव असेल कसा गं
मज ठाव नाही माते
परि त्याच्याहूनी थोर
तुझे-माझे नाते ,

आई तुच माझा गुरु
तुच गं देव्हारा
सदा संगे राहो
तुझ्या मायेचा आसरा ,

साऱ्या आयुष्यात आज
एक मागनं देवाला
जाईल माझा प्राण
जेव्हा सोडूनी देहाला ,

त्या मुक्त प्राण ज्योतेतही
वात्सल्य झळकत राहो
आई, आई शब्दांचा
नाद निनादत राहो .

कु. रविना मोहन चव्हाण
एम.ए (मराठी) भाग २

========================

**जरा जगुन बघा..**

आयुष्य एकदाच मिळालंय
जरा जगुन बघा..
मृत्यूच्या पायरी जाण्यापूर्वी
त्या आईची कुस आठवुन बघा
आयुष्य एकदाच मिळालंय
जरा जगुन बघा...
स्वतचा घात करण्यापूर्वी
त्या भाऊबीज रक्षाबंधनाच्या नात्याची
वेडी माया तरी समजुन बघा
आयुष्य एकदाच मिळालंय
जरा जगुन बघा...

रागानी जीव घेण्यापूर्वी
न रामलक्ष्मणाची बांधिलकी ओळखून
आपल्या भावाची प्रेमळ हाक देऊन बघा
आयुष्य एकदाच मिळालय
जरा जगून बघा...
आत्महत्या करण्यापूर्वी
प्रेमाची वाट बघणाऱ्या त्या
बायकोची केविलवाणी नजर तरी बघा...
आयुष्य एकदाच मिळालं
जरा जगून बघा..
नाही कमावता आला बक्कळ पैसा
तर माणुसकीचे प्रेमाचे आपुलकीचे
दोन माणसं जुळवून बघा..
आनंद मिळेल एकदा जगून तरी बघा...

**योगिता जुमळे**
एम.ए.भाग२ मराठी

========================

**का गं आई**

का गं आई माझ्याशी अशी निष्ठूर वागलीस?
कळीचं फुल होण्याआधीच...
कळी देठापासून मोडलीस!!
मला थोडं जगायचं होतं..
हे जग मला बघायचं होतं..
का देठ तू मुळापासून मोडलसं?
देठ मोडायचंच होतं तर;
माझ्याशी नातं का जोडलस?
उत्तर आहे या प्रश्नाचं तुझ्याकडे?
का केलास माझ्या
जीवनात अंधार सगळीकडे?
का ओळखले नाहीस
माझ्या मनातील भाव...
मला निर्माण करायचं होतं
स्वप्नातलं एक गाव!
अश्या कोणत्या मोहाला
आई - बाबा तुम्ही भाळलात
सांगा ना...
असा जीव घेणा खेळ
का खेळलात माझ्याशी
असं वागतांना आई
का गं आली नाही माझी दया
मुलावर करते इतकी
माझी का केली नाहीस माया...!!

भाग्यश्री मोतीराम चक्रणारायन
एम ए मराठी भाग २

========================

**मन**......

मन काळोखाची गुँफा,तेजाचे राऊळ,
मन सैतानाचा हात, तर स्वर्गाचे मंदिर ,
मन हे एक मन असते।

मन जवळ असले तरी दूर उडत असते,
कधी हसत असते कधी रडत असते.
मन हे एक मन असते।

मन कधी आनंदी असते कधी उदास असते
कधी सवंगडी तर कधी वैरीहि बनते
मन हे एक मन असते।

मन जगाचे मालकही बनते
आतल्या ईच्छाचे भंडार तर केव्हा दासही बनते,
मन हे एक मन असते।

शरीर या मनाच्या तालावर नाचे
याच्यावर तुमचे आमचे व्यक्तीमत्त्व ठरे,
यशापयश माप सगळ्यांच्या पदरात पडे ,
मन हे एक मन असते।

मनाला लगाम ज्या हाती असे
यशाचा वारा त्यांच्या पदरी दिसे,
मन हे एक मन असते....।।

अ .वि. सरकटे
एम.ए.भाग 2 मराठी
========================

**कर्तव्याची दोरी**.....
कर्तव्याची दोरी
एकदा लागली मागारी,
ते पूर्ण करताना
मायबापाच आयुष्य सरी.

स्वताचे जगणे विसरून
मायबाप राबराबतात,
आयुष्य उधार ठेवून
लेकरांना शिकवतात

मायबाप नेहमी लेकरांसाठी
झटतात,
मुले आपली कतरव्य
का विसरतात

मोठं झालेल्या मुलांना
का कळत नाही,
आई वडिलांचे कष्ट
कसे दिसत नाही...।।
अ.वि.सरकटे
एम.ए.मराठी भाग-2
========================

**मैत्री** ...
मैत्री नको फुला सारखी
क्षणभर सुगंध देणारी ,
नको सुर्या सारखी
सतत तापलेली
दिवसा न साथ देणारी ,
नको सावली सारखी
कायम पाठलाग करणारी ,
मैत्री हवी अश्रू सारखी
सुख दु:खात समान साथ देणारी ,
ती असावी,जी आपणास
'मित्र'म्हणवणारी ,
ती असावी नदी सारखी
शेवटी.........
खळखळ वाहत जाऊन
पुन्हा ,
मलाच येवून भेटणारी .

रविना मोहन चव्हाण
एम.ए.(मराठी)भाग-२
========================

**भावनाचा ओलावा...**

ओलावा तो भावनाचा अन्
डोळी हिरमूसलेली पाणी
थोडा स्पर्श हवा त्या ओलावव्याचा
या अंतकरणाच्या जखमांना ही
जाणिवांच्या पावसाची
थेंब शुस्क का ही भासते
ओल ही त्या संपदनाची
आज आटली का वाटते ?
पापन्यांचा गारवा
त्या अश्रूंनाही झाकते
भावनांचा ओलावा
जेव्हा नयनी या दाटते.....
स्वरचित

कु.दिपती पवनराव बाजड
एम.ए (मराठी) भाग २

**प्रेम**

१) नजरेत माझ्या तु असा बसावा
फुलामधे जसा पाण्याचा थेंब वसावा

2) जुनचं हे प्रेम आपलं पावसात नव्याने बहरूनी आलं
तुझ्या आठवणींच्या सरींने मन ओलचींब झालं

3) अश्याच श्रावणधारा बरसत राहो तुझ्या आठवणींने
मनाचा कोपरा उजळत राहो

4) याची जाणीव आहे मला, तुझे माझ्यापेक्षा
मातृभुमीवर अगणित प्रेम आहे म्हणूनच मी तुझी
असल्याचा मला सार्थ अभिमान आहे

5) तुझ्या सहवासाच्या मिळालेल्या थोडक्या क्षणांचा
गुंफलाय मी हारतुझ्या आठवणींच्या फुलांचा मनात
दरवळतो सुवास

6) कधी तु डोळ्यांमधून अश्रूंच्या रूपाने बाहेर पडतो तर
कधी ओठांवरिल हसू अलगद बाहेर पाडतो

7) पण जस आभाळ रीत झालं, पाऊस ओसरला
तसा तु नजरेतून हृदयात हळूच स्थिरावला

8) परत येईल पाऊस परत धरणी निघेल न्हाऊन
तेव्हा विरहाच्या वेदनांवर हळूच फुंकर घालण्यास सख्या
येशील ना रे धावून...

नजरेत माझ्या तु असा बसावा
फुलामधे जसा पाण्याचा थेंब वसावा

मधू सुनिल हातोलकर
वर्ग - MA भाग 2

========================

**पहिला पाऊस**

पहिला पाऊस हा वाटतो आम्हासी नयनरम्य..
त्या मध्ये भिजून आम्ही घेतो आनंद कधी जास्त तर
कधी सौम्य.

हिरवळ.. अशी चोहीकडे सजत असे उज्वल..
जणु राजा येतोय आगमनाला करतीये रयत... दीप
प्रज्वल.

फुल हसुनी आनंदाने बहरू लागती वाऱ्यामध्ये..
सुगंध देऊनी सुखाचा नाचु लागती पावसा मध्ये.

लहान होतो तेव्हा आई एक सांगायची..
पहिला पाऊस याचे महत्त्व ती मला पटवायची.

मी शांत बसुन ऐकले एकदा खरे
पाऊस मध्ये भिजुन म्हणे घामोळ होतात बरे..□

हेच वाक्य मी अजून सुद्धा मानतो
पहिला पाऊस येताच मी.. पाण्यात चिंब होऊन नाचतो..

पाऊस हा जगवतो साऱ्या जगाला..
मात्र शेतकरी चा बाप होऊनी आधार देतो पोराला.

असा असतो हा पाऊस येतो वरूनी नभातूनी साठवून
ठेवूया आपण अमृत हे नका जाऊ देऊ वाया कोणी..

शिवम गजानन कुळकर्णी
वर्ग -: B A 1st

========================

**आई....**

आई म्हणजे जीवनाची कहाणी
आई म्हणजे साक्षात संतवाणी
आई म्हणजे मृगजळातले पाणी
आई म्हणजे दुधावरची साय

आई म्हणजे थकलेल्याचे पाय
आई म्हणजे पहिला घास, पहिला श्वास
आई म्हणजे जीवन दरवळवणारा सुवास
आई म्हणजे वेदनेवरची फुंकर
आई म्हणजे जीवनातला पहिला स्वर
आई म्हणजे पहिला शब्द.. सारं निशब्द
आई म्हणजे देव्हाऱ्यातली समई
आई म्हणजे ज्ञानप्रकाशाची अखंड ज्योत
आई म्हणजे मनमंदिराचा कळस
आई म्हणजे नांदत्या वाड्यातली तुळस
आई म्हणजे अमृताचा वाहता झरा
आई म्हणजे जीवनमुकुटावरचा तुरा
आई म्हणजे अवघी जीवणगाथा
आई चरणी राहो माझा अखंड माथा
आई चरणी राहो माझा अखंड माथा....!

कु. वैशाली तुलारामजी खोब्रागडे.
========================

**तो फक्त बाप असतो**

सकाळ झाल्यावर निघुन जातो,
रात्री घरी उशिरा परत येतो,
दिवसभर उन्हात थकतो,
परंतु घरी आल्यावर चेहर्यावर स्मिथ हास्य दाखवतो,
तो फक्त बाप असतो....... |

आपला खर्च कमी करून,
घरच्यांचा गरजा पूर्ण करतो,
मुंलाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी
त्याच्या स्वप्ननाचां त्याग करतो,
तो फक्त बाप असतो....... |

घरच्यांचा बाबतीत विचार करनारा,
परिवाराचे स्वप्न पूर्ततेसाठी स्वतःचा देह झिजवनारा,
आणि आपल्या आधी मुलांचा विचार करनारा,
तो फक्त बाप असतो....... |

मुलाला नऊ महिने पोटात ठेवते,
ते आई असते...,
मात्र मुलानां आयुष्यभर डोक्यात ठेवतो,
तो फक्त बाप असतो....... |

योगेश माणिकराव पवार
M.A. 1st year (Economics)
========================

**कष्टाची वाट**

प्रतिदिन सुखाचे
दारात लोळण.....
परि मन माझे
आहे का विराण ।।
धावते हे जग
स्पर्धाही अफाट.....
अस्तित्व टिकवताना
होते फरफट ।।
कष्टाची वाट ही
मोठी खडतर.....
चालताना ती
झेलले प्रहार ।।
संघर्ष करताना
बदलले मुखवटे....
माझ्याच दुनियेत
मन माझे एकटे ।।
अस्वस्थ असे मन
बोलले मला हे.....
विसरून देह भान
जग, मोहक क्षण हे ।।
ध्येय गाठताना
मन मलाच सांगे.....
राहा प्रामाणिक तू
तुझ्याच सांगे ।।
सुंदर विचारपुष्प

मनी रेंगाळतात.....
विराण मनात या
सुगंध पसरवतात ।।

धिरज म. खंडारे
एम. ए मराठी भाग-२
========================

**निवांत**

थोडासा वेळ हवाय,
फक्त आणी फक्त स्वतःसाठी.
कधी तरी वाटतं,
एवढी ती धावपळ कश्यासाठी.
थोड्याश्या गप्पा थोडी शांतता,
थोडा एकांत आणी आराम.
या सगळ्यासाठी करावा,
दगदगीच्या वेळेला रामराम.
खुप लांब जाव,
या सगळ्या व्यापातून.
फक्त थोडासा वेळ हवाय,
आयुष्याच्या मापातून.
सतत तान तनाव,
पळतोय घड्याळ्याच्या काट्यासोबत.
बालपणीचा रस्ता चुकलोय,
जगण्याच्या या वाट्यासोबत.
खुप काही मिळवताना,
खुप काही सुटतय.
धावणाऱ्या मनासोबत,
मन नेमकं तेच पाहतय.
पाहायचय आता सगळं,
थोडा वेळ निवांत थांबून.
धावणाऱ्या वेळेला सांगा आता,
ये मनाव्ह थोड माघूण.

धिरज म. खंडारे
एम. ए मराठी भाग-२
========================

**संवाद पाण्याशी**

करणी आहे म्हणे देवाची मिळे नारळात पाणी
पण रुसला का देवा अकोल्यावर हा विचार येतो माझ्या मनी
पेरले शेत मी मोठ्या हिमतीने
बी अन मी महाग किमतीने
पण शेतात उगवला अजून कोंब नाही
वाट पाहता पाण्याची आलं डोळ्यात पाणी
गुराढोरांची झाली आता दैना
पण पाणी म्हणे मी आताच येईना
आलं होतं पाणी पूर्णिमेच्या दिवशी
साखर वाटली आजीनं खाली केली पीवशी
माय करी नवस मेघराजाचा
तूच म्हणे वाली जगापोशिंदाचा
तुझ्याविना मी बैलगाडीच्या चाकावानी
आता तूच ये माझ्याजवळ तान्या लेकरा वानी

राजरत्न देवलाल गायकवाड
B.A. 3 year
-----------------------------------------------

## लेख (मराठी)

==========================================================================

### आता तरी सजग होऊ या

मुंगी देखील डिवचल्यावर
प्रतिकाराखेरीज राहत नाही
आपण निसर्गाशी पंगा घेतलाय
प्रतिघाताशिवाय गत्यंतर नाही

निसर्ग आणि मानवाचा संबंध तसा फार जवळचा आणि निरंतर आहे अगदी जन्मापासून मृत्यु पर्यंत आपल्या दैनंदिन गरजा असो वा मानवाची विविध क्षेत्रातील प्रगती किंवा संशोधन, निसर्गाशिवाय अशक्य ! निसर्गाने मानवाला कोणती गोष्ट दिली नाही ? सर्वकाही निसर्गानेच तर दिले आहे आणि मानवाने त्या बदल्यात दाखविला तो फक्त स्वार्थ. मानव हा विकास करण्याच्या नावाखाली निसर्गाचा इतका कसा काय नाश करू शकतो ? हाच का तो एकविसाव्या शतकातील सुशिक्षित मानव ? आज चंद्रावर जाण्याची भाषा करणारे पृथ्वीवर अंदाधुंदपणे पर्यावरणाचा ऱ्हास करतांना दिसतात. मानवाची हाव ही न संपणारी गोष्ट आहे. मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी वने नष्ट केली. वनातील प्राणी नष्ट केलेत. पूर्णतः निसर्गावर आक्रमण केले. विकासाच्या नावाखाली अमाप वनक्षेत्र नष्ट करून मोठे मोठे उद्योग उभारले जात आहेत.

विकासाची सबब दाखवून हजारो हेकटर जमीन खाली केले जात आहे. आणि त्यातून निघणारे रसायने मानवाची जीवनयात्रा संपविण्याच्या तयारीत आहेत. तरी सुद्धा आज आपण त्यास विरोध करण्यास तयार नाही. हो मान्य आहे की विकास होणार. अविकसित आणि विकसनशील देश विकसित देशयाच्या पंक्तीत गणले जातील परंतु त्या नष्ट झालेल्या जैवविविधतेचे काय ? त्याचे जबाबदार कोण ? याच्या रक्षणाची जबाबदारी कोणाची ? यालाच जर विकास म्हणायचे असेल तर तो विकास किती उपयुक्त आहे हे वेगळे सांगायला नको.

काही दशकानंतर अविकसित देश आणि विकानशील देश विकसित देशाच्या यादीत नाव झळकताना पाहतील परंतु या विकासाच्या उद्धिष्टापोटी किती जैवविविधता नष्ट केली असा प्रश्न उद्याच्या पिढीने विचारला तर त्यांना काय उत्तर देणार ? की त्यांना समजावणार पर्यावर्णापेक्षा विकासाचे महत्व ! कदाचित उलट नवीन पिढीच तुम्हाला समजावणार पर्यावरणाचे महत्व. पर्यावरण आणि विकास एकाच रथाची दोन चाके आहेत. त्याचे संतुलन राहिले तरच रथरुपी जगाचा प्रवास सुखाचा होणार नाही तर त्याची फळे भोगावी लागणार हे जिवंत उदाहरण !

वृक्ष वल्ली आम्हा सोयरे वनचरे ।
पक्षीही सुस्वरें आळविती ॥
येणे सुखे रुचे एकांतवास ।
नाही गुणदोष अंगा येत ॥

सोळाव्या शतकात संत तुकाराम महाराजांनी केलेला उपदेश आज सुद्धा लोक ऐकायला, समजायला तयार नाहीत. हे किती दुर्दैव आहे. आजचा मानव हे विसरत चालला आहे की मानव हा निसर्गाचा एक छोटासा अंश आहे, पूर्ण निसर्ग नाही. मानवाने प्रगती केली पाहिजे, नवनवीन शोध लावले पाहिजे परंतु निसर्गाला बाधा पोहचवून चालणार नाही. अन्यथा

त्याची किंमत मानवजात नष्ट करून द्यावी लागेल. त्याशिवाय पर्याय नाही, हे खरे! मानवाने मानवाने कितीही प्रगती प्रगती केली तरीही तो निसर्गावर ताबा मिळवू शकला नाही. अशी कितीतरी उदाहरणे काळाच्या पडद्याआड गेली. जेंव्हा जेंव्हा मानवाने अतिरेक केला तेंव्हा तेंव्हा निसर्गाने मानवाला त्याची जागा दाखवून दिली. याचे जिवंत उदाहरण वेगळे सांगण्याची गरज नाही. मानवाने कधी विचारही केला नसेल अशी आज परिस्थिती उभी राहिली आहे. मानव म्हणजे किड्यामुंग्यांसारखी मृत्यु पावत आहेत. आज कोरोना संसर्ग होऊन डिड वर्ष उलटले आहे आणि मृत्यूचा आकडा तीन ते चार कोटीच्या घरात ! एवढे पुरेसे नसेल तर काळाच्या पडद्याआड थोडे झाँकूया म्हणजे कळेल निसर्गाला आव्हान देण्याची किंमत.

1350साली आलेल्या प्लेगमुळे तर पृथ्वीवरची एकतृतीयांश लोक मृत्यु पावले. मग 1655 साली आलेल्या प्लेगमुळे लंडनमधील 20% लोक मृत्यू पावले. 18 व्या शतकाच्या सुरुवातीपासून सुमारे दीडशे वर्षांमध्ये जगभर कॉलरा रोगाची साथ सात वेळा पसरली. रशिया, स्पेन, आफ्रिका, चीन, जपान आणि इंडोनेशिया सह अनेक ठिकाणी लाखो लोक मरण पावली. ही सर्व उदाहरणे हेच सांगतात की पर्यावरणाच्या मर्यादेत राहूनच प्रगती करा आणि निसर्गाला आव्हान देऊ नका.

निसर्ग शक्तीपुढे मानव शक्ती ही फक्त अंश आहे. मानवजातीवर संकट आल्यावर मानव हतबल होतांना दिसतो आणि शेवटी निसर्गच मानवाच्या मदतीला धावतो. ही गोष्ट तर विसरायला नकोच ! त्याचे ताजे उदाहरण ऑस्ट्रेलियाच्या जंगलामध्ये लागलेली आग. प्रशासन आणि सरकारचे सर्व प्रयत्न पणाला लावून सुद्धा आग आटोक्यात आली नाही तेंव्हा औस्ट्रेलियाने हतबल होऊन निसर्गापुढे गुढगे टेकले, त्यावेळी निसर्गच त्यांच्या मदतीला धावला आणि लागलेली आग पावसामुळे विझली. तेंव्हा ही गोष्ट विसरून कशी चालणार की शेवटी निसर्गच तारणहार !

'धर्मो रक्षति रक्षित' असे एक संस्कृत वचन आहे. असेच एक वचन आता रूढ करायला हवे निसर्ग वाचवला तरच तो आपणाला वाचवेल. हे आचरणात आणले जाईल तेंव्हाच निसर्ग आनंदात राहील आणि आपल्यालाही जगवेल. निसर्ग ही एक अनमोल देन आहे. तो एक अनमोल ठेवा आहे. हे लक्ष्यात घेऊन निसर्गाचे सच्चे मित्र बनायला हवे. साडेचारशे कोटी वर्ष वयाच्या पृथ्वीने पाच वेळा महाविनाश बघितला आहे. आता सहाव्या विनाशाकडे वाटचाल सुरु झालेली आहे. आधीच्या महाविनाशामध्ये प्राणी व वनस्पतीच्या लाखो प्रजाती नष्ट झाल्या. डायनासोर सारखे अजस्त्र प्राणी टिकाव धरू शकले नाहीत. त्या सर्व आपदा निसर्गनिर्मित होत्या. यावेळचे संकट मनुष्यनिर्मित असेल. कोरोना संकट, टोळधाड, चक्रीवादळ हे सृष्टीचे मनुष्याला दिलेले कदाचित शेवटचे इशारे आहेत ते गांभीर्याने घेऊन सृष्टीला पूर्ववत करण्यासाठी तातडीने धोरणात्मक उपाययोजना करणे गरजेचे आहे.

"भविष्याचा ओळख धोका  
वसुंधरेच्या ऐका हाका  
पर्यावरणाचा तोल राखा  
नंतर गोड फळे चाखा"

धन्यवाद.....

विशवनाथ लक्ष्मण डोखळे B.A.II

## लग्न एक करार

(सद्यस्थिती आणि तरुणांची भूमिका)

आदर्शवत भारतीय संस्कृतीला लागलेला एक काळपट डाग म्हणजे "हुंडा पद्धती" असे म्हणाव लागेल. परंपरेने चालत आलेला हा प्रकार आज २१ व्या शतकात देखील तेवढ्याच विदृप्तेने भारतीय संस्कृतीवर आघात करतो आहे. कारण आज सद्यस्थितिचे सामाजिक चित्रण पाहता आज देखील बऱ्याच ठिकाणी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पणे हुंडा पद्धतीचा अवलंब केला जात आहे आजही चांगल्या पगाराची नोकरी असणारेच मुल हुंड्याची मागणी करताना दिसतात. शासनाने हुंडा विरोधात १९६१ मधे हुंडा प्रतिबंध कायदा करण्यात आला. १९६१ हुंडा प्रतिबंध कायद्यानुसार कलम ३ आणि ४ अन्वये विविध शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे मात्र या कायद्या कडे दुर्लक्ष करून आज २१ व्या शतकात हुंडा पद्धती अबाधित आहे जे आजतागायत कायद्याचा अभ्यास करत आहेत ते देखील याला अपवाद नाही.

जे तरुण देशसेवा करतात आज त्यांच्याकडे पूर्ण भारत देश अभिमानाने बघतो तेच देशविर त्यांच्या पगाराच्या बढाया मारत वाढू पित्याकडे लाखो रुपयांची मागणी करतात ( अनुभव कोणालाही उद्देशून नाही ) आज जर आपल्या देशातील वधू पित्यानी निश्चय केला की मी फक्त मुलगी देईल हुंडा देणार नाई कुठलाही वर पिता त्याच्या मुलाला लग्नाशिवाय ठेवणार नाई मग का म्हणून वधुपित्याने नेहमी स्वतःला आणि आपल्या मुलीला कमी समजावं.कारण समाजाचं भयानक वास्तव अस आहे की ज्याच्या कडे खूप पैसा आहे तोच पैसा मागतो आणि लग्न या पवित्र गोष्टीचा व्यवहार करतो. सामान्य गोष्टींना महत्व न देता समाज एका विद्रूप विचाराकडे वाटचाल करत आहे.

आपण वर्तमानपत्रामधे अशा अनेक बातम्या वाचतो पैशासाठी बापाने मुलीला विकले हे विदृपच आहे. पण जे बाप राजरोस पने आपल्या मुलीला लग्न या करारात जराही विचार न करता आपली मुलगी शिकलेल्या प्रतिष्ठित घरात विकतो. या कडे समाज दुर्लक्ष करतो आणि ज्या व्यक्तीने वधू पित्याकडून भली मोठी रक्कम वसूल केली आहे त्यांना उच्च स्थानावर नेऊन ठेवतो. वधू पित्यांना इतकंच सांगायचं की तुम्ही तुमच्या मुलीचं चांगल बघायच्या नादात तिचा व्यवहार करता आणि तिला विकता या कडे समाज उघडपणे दुर्लक्ष करत आहे. हुंडा देणं म्हणजे तुम्ही जन्म दिलेल्या मुलीला एका अनोळखी माणसाला लग्न या करारात विकणे आहे

कु. दर्शना बळीराम सुशीर
एम.ए अर्थशास्त्र भाग २

## मी आहे ना•••

Everything is fine

आपल्या आयुष्यात आलेली माणसं ही काही उंगाच आलेली नसतात... प्रत्येक गोष्टीमागे काहीतरी कारण असतं... कुणाशी तरी काहीतरी ऋणानुबंध जुळलेले असतात... नाहीतर सव्वाशे करोड लोकसंख्येच्या देशात नेमक्या याच व्यक्तींशी आपली ओळख का होते ? याचे उत्तर कोणीही देऊ शकत नाही...

जी नाती तयार होतात ती आपण जीवापाड जपावी... आपल्याला जगण्यासाठी ज्या प्राणवायुची गरज असते तो प्राणवायु म्हणजे ही आपली माणसं... रक्ताच्या नात्यांना काही चाॅईस नसतो, पण आपलेपणाच्या नात्यात तसं नसत... Its Mutual relation... मन जुळलं की आपलेपणाचं नातं होते....

जे बंध खूप स्ट्रॉंग असतात ते कोणाच्याही सांगण्याने किंवा विपरीत परिस्थितीत कधीच तुटत नाहीत... आपण खूप वाईट परिस्थितीतून जात असताना मित्राचे किंवा मैत्रिणीचे " *मी आहे ना* " एवढे शब्द संजीवनीसारखे काम करतात ... अगदी प्रत्यक्ष नाही पण अप्रत्यक्ष सोबत असणं खूप सकारात्मक उर्जा देणारं असत... पैशांनी श्रीमंत होण खुप सोपं आहे हो... नात्यांनी समरूद्ध होण तितकच कठीण...Keep in touch .....

मयुरी विलास गिरी
M.A. { I Year}

---

## वृद्धाश्रमांची गरज का?

वृद्धाश्रमाची गरज काय? असा प्रश्न केल्यानंतर तुम्हालाही थोडं अवघडल्यासारखच झालं ना? अलीकडच्या काळात भारतीय पारंपारिक एकत्र कुटुंब पद्धती लोप पावुन विभक्त कुटुंब पद्धतीचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला आहे. छोटी छोटी कुटुंबे निर्माण झाल्याने, आई-वडिलांची जबाबदारी नकोशी वाटते.

लहानपणी अंगा- खांद्यावर खेळवणाऱ्या वडिलांना आणि गार झालेली चपाती आवडत नाही म्हणून गरमच जेवण बनवुन देणाऱ्या आईला पर्यायाने आपले जीवन पणाला लावणाऱ्या आईवडिलांनी वृद्धाश्रमात सोय असूनही, घरपण नाही , आपलेपणा नाही, स्वातंत्र नाही तसेच आजी-आजोबा हया हाकेचा आधारही नाही म्हणूनच माझा प्रश्न होता की, वृध्दाश्रमाची गरजच का निर्माण व्हावी? का? आपण स्वतःच्या आई- वडिलांना

टाकाऊ वस्तूप्रमाणे टाकून देतो. त्यांचा वृद्धापकाळ आपल्याला झेपवणारा नसतोच? म्हणूनच माझा एक छोटासा विचार की, आई-वडिलांना वृध्दाश्रमामध्ये न टाकता त्यांना मायेची हाक आणि प्रेमाचा आधार देऊन स्वतःसोबत शेवटचे आनंदाचे क्षण जगु द्या! म्हणजेच वृद्धाश्रमाची गरजच निर्माण होणार नाही.

संकलन
कु. राणी पांडुरंग विखे
एम. ए( मराठी) भाग-2

---

## मरण पेरावं लागेल !!

कृषिप्रधान देशातील शेतकर्यांना त्यांच्या हक्काचं आणि विश्वासाचं बियाणं अगदी कमी दरात मिळावं या उद्देशाने खरं तर महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळा ची ( महाबीज ) स्थापना करण्यात आली . पण आपल्या देशात थोडं उलट आहे, ज्या ज्या योजना शेतकर्यांच हित साध्य करण्यासाठी काढण्यात आल्या,त्यातून शेतकर्यांच हित साध्य झालं नाही उलट त्यांना अधिक गरीब करून त्यांचे लचके तोडण्याचे काम इथल्या व्यवस्थेने केले.

२०२०-२१ मध्ये शेतकर्यांनी करोनाच्या परिस्थितीतही मोठ्या प्रमाणात शेतीचे उत्पादन वाढविले.करोनाच्या महामारी सोबत शेतकर्यांना अस्मानी संकटांना सुद्धा सामोरे जावे लागले.मागल्या वर्षी अतिवृष्टी,उडीद व मुंगावर आलेला वायरस,कपासीवर आलेली बोंड अळी ,तुरीवर आलेला अमरवेल अशा अनेक संकटांचा सामना शेतकर्यांना करावा लागला.तरी सर्व संकटांचा सामना करून शेतकर्यांनी सोयाबीनचे उत्पादन घेतलेच.नाफेड ने ठरवून दिलेल्या ३८०० रू प्रति क्विंटल भावाने शेतकर्यांनी सोयाबीन विकले.पण कालांतराने शेतकर्यांजवळचे सोयाबीन संपले आणि त्याच वेळी मात्र सोयाबीनचे भाव वाढविण्याचे दुटप्पी धोरण सरकारने आखले.आणि सोयाबीनचे भाव प्रति क्विंटल ५००० -७००० रू च्या ही पुढे वाढविले.आणि चारही बाजूंनी मात्र 'आम्ही सोयाबीनचे भाव वाढविले ' असा उदोउदो केला.' शेतकर्यांनी शेतमालाची साठवणूक करायला हवी होती ' असे शहानपणाचे धडे प्रत्येकाने त्याला दिले मात्र साठवूणीकीसाठी गोदामाचं व्यवस्थापन करूण देण्याच काम कुठल्याही सरकारने किंवा कृषी विभागाने केलं नाही.त्यामुळे आल्या त्या भावात शेतकर्याला सोयाबीन विकल्या शिवाय दुसरा पर्याय शिल्लक राहिला नाही.दुसरीकडे मात्र सोयाबीनच्या तेलाचे भाव गगनाला भिडले.

सोयाबीन ३०-३५ रू किलो आणि तेल १२०-१५० रू किलो ! किती ही तफावत आणि हीच तफावत ग्रामगितेच्या माध्यमातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी मांडली की " कच्चा माल मातीच्या भावे | पक्का होतास चौपटिने घ्यावे || मग कैसे ग्राम जन सुखी व्हावे | पिकवूनिया उपाशी ते ||" सोयाबीनचे भाव वाढविल्यामुळे साहजिकच आहे की,महाबीज आणि इतर कंपन्या देखील त्यांच्या

बियाण्यांचे भाव वाढवतील.आणि झालं सुद्धा तसंच ,महाबीजने सोयाबीनच्या ३० किलो बॅगीचे भाव २२५० रू घोषित केले.महाबीजनेच इतके महागडे भाव ठरविल्यामुळे इतर कंपन्यांना तर संधीच मिळाली.त्यांनी सुद्धा बियाण्यांचे दर ३००० ते ३३०० रु. पर्यंत वाढविले.

मागल्या वर्षी महाबीजने ३० किलोच्या बॅगला १८०० -१९०० रू दर जाहीर केला होता.त्यात सुद्धा मोठ्या प्रमाणात बियाणे खराब निघाले होते आणि प्रत्येक बॅग मागे ५००-९०० ग्रॅम कमी सुद्धा निघाले होते.त्यामुळे शेतकर्यांना दुबार पेरणीला सामोरे जावे लागले.शेतकर्यांना आधीच दुबार पेरणी करावी लागली आणि अशा परिस्थितीत बियाण्यांचे भाव कमी करण्याचं सोडून ते वाढविणे कितपत योग्य आहे?

आमच्या शेतकर्यांचं सोयाबीन ३०- ३५ रूपये किलोने खरेदी केल्या जाते मात्र त्याच सोयाबीनचं बियाण शेतकर्यांना ७५-९० रू किलोने जर विकत घ्यावं लागतं असेल तर यालाच कृषिप्रधान देशाची व्याख्या म्हणायची का?

युरीया,डीएपी व इतर मिश्र खतांचे भाव ठरविण्याचे अधिकार २०१५ पर्यंत केंद्रीय रसायन व खत मंत्रालयाला होते.मात्र त्यानंतर त्यांनी खताचे भाव ठरविण्याचे अधिकार थेट कंपन्यांना दिले .आणि कंपन्यांनी शेतकर्यांचा विचार न करता अव्वाच्यासव्वा खताचे भाव वाढविले.खरं तर ज्या देशाला कृषिप्रधान म्हणून जगामध्ये ओळखल्या जाते, त्या देशातील शेतकर्यांना त्यांच्या पिकांचे भाव ठरविण्याचे अधिकार नाहीत मात्र दुसर्या बाजूला कंपन्यांना सबसिडी देऊन आपल्या उत्पादनाचे भाव ठरविण्याचे अधिकार आहेत.

केंद्र सरकारने खते आणि बियाण्यांचे भाव कमी करण्याचे फक्त आदेश दिले मात्र त्याची अंमलबजावणी झाली का ? याकडे मात्र सरकारी यंत्रणेचं लक्ष नाही.
राज्याच्या कृषि मंत्र्यांनी महाबीजला आदेश दिले की ' बियाण्यांचे भाव वाढवू नका '. आधीच भाव मागल्या वर्षीच्या तुलनेत सव्वापटीने वाढले आणि आता कृषिमंत्र्यांना जाग आली की भाव वाढवू नका ! कृषिमंत्र्यांनी भाव वाढवायला नकार दिला ,महाबीजचं बियाणे बाजारपेठेत विक्री करण्यासाठी अद्याप तरी नकार दिला नाही ,तरी देखील महाबीजचे बियाणे बाजारपेठेत विक्रीला का बरं आणल्या गेले नाही ?

देशातील खासगी कंपन्यांचं बियाणं जे महाबीजच्या बियाण्यांपेक्षा दुप्पट भावाचे आहे ,त्यांची विक्री व्हावी या उद्देशाने महाबीजने आपले बियाणेच बाजारपेठेमध्ये येऊ दिले नाही.सरळ-सरळ खासगी कंपन्यांशी हातमिळवणी करून शेतकर्यांना लुटण्याची एक नवीनच योजना त्यांनी शोधून काढली आहे.महाबीजकडे बियाण्याची विचारपूस केली असता त्यांनी सरळ उत्तर दिले की, सोयाबीनचे बियाणेचं आमच्या कडे नाही.खरं तर यासारखी हास्यास्पद दुसरी कुठली बाब नसेल की , खासगी कंपन्यांकडे बियाण्यांचे डोंगर उभे आहेत आणि महाबीज सारख्या सरकारी बियाणे मंडळाकडे

साधा सोयाबीनचा दाणा नसावा ? तर मग महाबीज स्थापनेचा उद्देश तरी काय?

महाबीजचं मुख्यालय असलेल्या अकोला जिल्हयात सोयाबीन बियाण्याचा वाटप हा शेवटच्या सोयाबीन उत्पादक शेतकर्यांपर्यंत पोहचायला पाहिजे होता. तसं जिल्हाभर नियोजन करायला पाहिजे होते,पण तसे न करता सोयाबीन बियाण्याचे वितरण करतांना प्रामुख्याने जिल्हा डीलर कडेच जास्त लक्ष देण्यात आले. प्रत्येक जिल्हा डीलर कडे दिलेले बियाणे किती होते ? ते प्रत्येक कृषी सेवा केंद्राला किती दिले ? त्यांच्या कडून शेतकऱ्यांकडे कसे वितरीत करण्यात आले ? या प्रश्नांची उत्तरं जिल्हा प्रशासनाकडे नसावी हीच मुळात शोकांतिका आहे.

महाबीजने वितरण केलेल्या बियाण्यांची जिल्हा प्रशासनाकडे कोणतीही आकडेवारी नाही.जिल्हमाला दरवर्षी प्रमाणे बियाण्यांचा किती कोटा असावा?असलेल्या कोट्यातून डीलर ला किती बियाणे द्यायचे? बचट गटाला किती व शेतकरी उत्पादकांना किती ?याचा लेखाजोखा व विवरण अद्यापही जाहीर झाला नाही .आणि जिल्हा प्रशासनाकडे याचा कोणताही हिशोब नाही. त्यामुळे विदर्भातील प्रमुख पिक असलेल्या ज्याला शेतकर्यांच ' पिवळ सोन ' म्हटल्या जातं त्या सोयाबीनच्या बियाण्याचा कृत्रिम तुटवडा निर्माण करण्याचा प्रशासनाचा हातखंडा आहे काय? कोविड संक्रमानच्या काळामध्ये सरकारने प्रशासनाला दिलेली कार्यालयीन काळाची ढील व त्यात अधिकाऱ्यांचा बेजबाबदार पणा व जनप्रतीनिधी व सरकारचा नसलेला अंकुश ही याची परिचिती आहे.महाबीजचे मुख्यालय असलेल्या अकोल्या जिल्हयातच जर ही परिस्थिती आहे, तर उर्वरित महाराष्ट्रातील शेतकर्यांची आणि इतर राज्यातील शेतकर्यांची काय परिस्थिती असेल ? खरं तर हा भीषण प्रश्न आहे.

शेतकर्यांच्या बांध्यापर्यंत बियाणे पोहचविण्याच सोडून ,त्यांना फांद्यावर कसं लटकवता येईल खरं तर यासाठी सरकारची धावपळ सुरू आहे.शेतकरी आधीच आर्थिक अडचणीत असल्यामुळे त्याला साधं जीवन जगणं सुद्धा कठिण जात आहे, त्यात खरच तो महागड्या बियाण्यांचा भार उचलू शकणार का ?

शेतकर्यांची परिस्थिती लक्षात घेऊन केंद्र सरकार आणि राज्य सरकारने त्वरीत खासगी बियाण्यांचे भाव कमी करावे आणि महाबीज चे बियाणे बाजारपेठेत विक्रीसाठी उपलब्ध करून द्यावे,अन्यथा शेतकर्याला यावर्षी काळ्या माती मध्ये बियाण्याच्या जागी स्वताचं मरण पेरावं लागेल ! आणि याला कारणीभूत फक्त या देशाची कृषिप्रधान व्यवस्था असेल.

Satish Dadarao Chakranarayan
M.A.-2 year

---

## वाचनसंस्कृती : एक अनुबंध

"वाच वाचता पुस्तक मस्तक घडते ।
शब्दांनाही आशयाचे मग स्वप्न पडते"

निरामय आणि सुंदर समाधानी जीवन समाजातील प्रत्येकाला लाभावे असे आज बहुतेकांना वाटते त्यासाठी एक उदार मानवतावादी समाज निर्मान होणे ही काळाची गरज आहे. स्वत:चे स्वातंत्र्य आणि सुरक्षितता जपतांना इतरांच्या स्वातंत्र्याला आणि सुरक्षिततेला धक्काही आपल्याकडुन लागु नये, ही समाजाची उन्नत अवस्था आहे. यासाठी अनुकूल वातावरण निर्माण होण्यासाठी जे वैचारीक अधिष्ठान संपुर्ण समाजालाच असायला हवे ते आपल्याला वाचनसंस्कृतीच देऊ शकते.

बुध्दीला सुसंस्कारीत करण्याचे काम साहित्यच करीत असते. वाचनातुन प्रगल्भ झालेला बुध्दिप्रामाण्यवादी दृष्टिकोन मानवी जीवनात आयुष्यभर दीपस्तंभाचे काम करतो. साहित्यामध्येच वैश्विकता असते. विश्वातील अवुभव घेण्यासाठी विश्व धुंडाळण्याची गरज असते. ग्रथांच्या सानिध्यात आपण सगळं विसरलो की, विश्वच आपल्यामध्ये सामावत जाते. मनाच्या संवेदनशीलतेला आवाहन करुन प्रेम, कारूण्य, सहकार्य, सहभाग, मैत्रभाव या सद्गुणांची, सत्यं, शिव, सुंदर या जीवनमुल्यांची रुजवणूक अंत:करणाच्या गाभ्यात आपसुकच होते. नीती म्हणजे काय? अनिती म्हणजे काय? वर्तमान शुध्दता कशी आणावी स्वार्थ, अहंकार, दंभ, आणि दृष्टता यापासुन सर्वस्वी अलिप्त कसे राहावे याचे पाठही कुणी तरी देण्याची गरज भासत नाही.

आपन सर्व मानवप्राणी म्हणजे फाशीची शिक्षा झालेले, पण थोड्या मुदतीसाठी मोकळे सोडलेले कैदी आहोत. दुर्दैव म्हणजे फासावर लटकविण्याचा दिवस मात्र आपल्याला माहिती नाही. अशा अनिश्चित आयुष्याची वृध्दी आणि उन्नती, प्रगती, करायची असेल तर वाट्याला आलेला प्रत्येक क्षण न् क्षण आपल्याला उत्कटतेने आनंदाने जगून घेता आले पाहिजे भान-समज आपल्याला वाचन संस्कृतीतुनच मिळते.

प्रत्येकाला वाचनाची सवय लागली पाहीजे. असे जेव्हा आपन म्हणतो तेव्हा या वक्तव्याला एक विस्कळीतपणा आणतो. वाचन सवय नसावी तर वाचन ही आपली सर्वाची गरज असावी, जर सवय म्हटली की ती टाळता येते. पण ज्याप्रमाने मानवाला जगण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा या जीवनावश्यक गरज बनली पाहीजे. सकाळ व संध्याकाळ झाली म्हणजे आपल्या पोटाला भुकेची जाणीव होते. निवाय्रासाठी घर शोधावेच लागते. त्याच प्रमाणे दिवसातील चौविस तासांपैकी हक्काचा अर्धातास वाचनासाठी राखुन ठेवता आला पाहिजे.

ग्रंथसंपदेचा अखंड सहवास ही जेव्हा माणसाची गरज बनते. तेव्हा प्रसन्न आणि समृध्दी नसतांनाही तो कुबेरापेक्षाही धनवान बनतो असे जगद्गुरू तुकोबारायांनी सतराव्या शतकातच सांगीतलय.

"आम्हा घरी धन शब्दाचीच रत्ने
शब्दाचीच शस्त्रे यत्ने करू

शब्द हेची आमुच्या जीवाचे जीवन
शब्द वाटु धन जनलोका"

"वाचाल तर वाचाल" हे डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे मत आज कालच्या ओघात आपल्याला महत्वाचे वाटत नसेल; मात्र वाचन हाच आपल्या प्रगतीचा पाया आहे, हे लक्षात घेणे गरजेचे आहे. गतीच्या या युगात पुस्तके वाचायला वेळ कोणाला? हे बहुतांश लोकांन कडुन ऐकायला मिळते. कारण आज पुस्तकांची जागा संगणकाने घेतली आहे. संगनक युगात आजही करोडो रूपयाची पुस्तके खरेदी केल्या जातात. ही वाचनसंस्कृतीची तद्घास्थीती आहे. यावरून पुस्तकाचे आकर्षन कायम आहे. असे म्हणायला हरकत नाही.

वाचन म्हणजे सुसंस्कृततेचा वसा. चीनी तत्ववेत्यानं म्हटलय की जर तुमच्या जवळ दोन रूपये असतील तर एक रूपयाची भाकरी घ्या आणि एक रूपयाचे फुल घ्या. भाकरी तुम्हाला जगवते आणि फुल कसं जगायच हे शिकवतं.

आशावादी दृष्टिकोनातुन मानसाची जीवनेच्छा प्रेरित होते. भविष्यात जे काही दडलय ते सुंदर रूपात समोर यावं म्हणून घडवण्याची मनोवृती माणसाला बरेचदा लेखनासाठी प्रेरित करते. याच उत्सुकतेचा टवटवीत आशावादाचा अनुभव वाचकाला त्या साहित्यकृतीतुन येत असतो. एखादी साहित्यकृती वाचल्यानंतर नेहमीच्या दिनचर्चेत नव्या सुखाची आनंदाची किरनं पडावीत आणि अवघे आयुष्य उजळुन निघावे. अशी काही जादु घडते. चरित्रवाचनातून चारित्र्य घडतं असे म्हणतात ते काही उगीच नाही.

राणी एकनाथराव गावंडे
एम.ए  मराठी भाग एक

---

## आता उगारायलाचं हवा शेतकऱ्यांनी आसुड

"पोसत आली उभ्या
जगाला शेती माझी
मी कुणाच्या
तुकड्यावरती जगलो नाही"

मित्रहो विषयाची सुरुवात करत असताना सांगावस वाटतं,कि ज्या बळीराजाच्या मस्तकावर पाय ठेवून इथली व्यवस्था उभी राहिलीआहे. बळकट झालेली आहे, म्हणजे स्वातंत्र्यपूर्व कालखंडाच्या आधीपासून नव्हे तर त्या आधीपासून तर आजच्या व्यवस्थेपर्यंत शेतकऱ्यांचा बळी घेण्याचं काम या व्यवस्थेने केले आहे. भारताला स्वातंत्र्य मिळालं परंतु अजूनही शेतकरी स्वातंत्र्य झाला आहे का?.. हा महत्त्वाचा प्रश्न माझ्यासारख्या शेतकरी पुत्राला जर पडत असेल तर या कृषिप्रधान देशाची अत्यंत शोकांतिकेची बाब आहे. ज्या कृषिप्रधान देशाला जगामध्ये उच्च दर्जाचे स्थान दिल्या जातं त्याच कृषिप्रधान देशांमध्ये साहेबराव करपे पाटलाला जे कि सदन कास्तकार होते त्यांना सहकुटुंब आत्महत्या करण्याची वेळ येते. तर या देशांमध्ये शेतकरी संपवण्याची परिस्थिती निर्माण झाली नाही ना! हा दुसरा प्रश्न माझ्यासमोर महत्त्वाचा ठरतो.

माझ्या डोळ्यासमोर उभा राहतो. गेल्या सहा महिन्यापासून दिल्लीच्या तख्तावर शेतकरी आंदोलन करत आहे कृषी विषयक काळया कायद्याचा विरोध करत आहे. परंतु इथली व्यवस्था त्यांना देशद्रोही म्हणून किंवा आतंकवादी म्हणून गणना केली जाते. लाजिरवाणी बाब आहे जो व्यक्ती तुमच्या ताटापर्यंत भाकर आणून देण्याचं काम करतो. त्याच व्यक्तीला जर तुम्ही आतंकवादी म्हणत असाल तर तुमच्या आमच्यासारखे नक्षलवादी दुसरे तिसरे कोणी नाही असं मला मन्हावसं वाटतं.

मुळातच या कृषिप्रधान देशामध्ये उद्योगपत्यांचं कर्ज माफ केला जातं परंतु शेतकऱ्यांचे कर्ज याठिकाणी माफ केल्या जात नाही. उद्योगपत्यांना अनेक प्रकारच्या सबसिड्या दिल्या जातात परंतु शेतकऱ्यांना या ठिकाणी कुठली प्रकारची सबसिडी दिली जात नाही. शेतकऱ्यांचा कर्जमाफी चा जेव्हा प्रश्न येतो तेव्हा शासनाकडे पैसा नसतो परंतु उद्योगपत्त्यांना कर्ज देताना नवीन योजना राबविल्या जातात. ज्यांचं पोट हातावर आहे त्यांच्यासाठी या देशांमध्ये काहीच नाही परंतु ज्यांचं पोटावर हात आहे त्यांच्यासाठी इथली व्यवस्था नवनवीन सबसिड्या , योजना आखत आहे. माझ्यासमोर प्रश्न उभा राहतो भारत हा कृषिप्रधान देश आहे कि उद्योग प्रधान देश आहे. हे या कृषिप्रधान देशाचे दुर्दैव आहे. पतंजली सारख्या कापसाचा भाव एक लाख साठ हजार रुपये ठरवल्या जातो. आणि एका बाजूने माझ्या शेतकरी बापाने पिकवलेल्या कापसाला भाव चार ते पाच हजार रुपये दिल्या जात नाही. ही वस्तुस्थिती आहे ही वस्तुस्थिती कुठेतरी बदलायला पाहिजे! याकरता सर्व शेतकऱ्यांनी, सर्व भूमिपुत्रांनी एकदा पुन्हा आसूड उगारायला हवा . माझा कापूस साऱ्या जगाच्या वेदना पुसण्याचे काम करतो परंतु आज ज्या कापसाला वेदना झालेल्या आहेत त्याकडे शासनाचे कुठलेही लक्ष नाही. महाबीज कंपनीकडून मिळणारे बियाणे अल्पदरात उपलब्ध करून देणार परंतु त्याची गुणवत्ता ही शासनाने तपासली नाही. शेतकऱ्यांना उपलब्धही झालं नाही. नाईलाजास्तव शेतकऱ्यांना प्रायव्हेट कंपनीकडून  बियाणे खरेदी करावी लागेलं त्यांची फसवणूक झाली लुबाडणूक झाली हे कुठेतरी थांबायला हवं. या देशांमध्ये पार्लेजीचा जर पुडा स्वतःचा भाव ठरवून कारखान्याचे बाहेर पडतो. परंतु शेतकऱ्यांने रात्रीचा दिवस करून पिकविलेल्या शेतमालाचा भाव ठरविण्याचा अधिकार नाही. अशी भयंकर स्थिती भारतीय कृषिप्रधान देशाची आहे. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामगीतेत वर्णन करतात...

कच्चामाल मातीचे भावे
पक्का होताच चौपटीने द्यावे
मग ग्राम जन कैसे सुखी व्हावे
पिकुनिया उपाशी ते...

शेतकऱ्यांना पक्का माल बनवण्याकरता शेती पूरक सुविधा देणे हे शासनाची जबाबदारी आहे. आज आम्हाला पोषण करते मिळत नाही परंतु जागोजागी शोषण करते मिळत आहे.

सावकार,व्यापारी,अळते,कृषी सेवा केंद्र एवढेच नव्हे तर शेतकरी विरोधी कायदे करून व्यापारी वर्गाच्या दावणीला बांधण्याचे काम शासन करत आहे. आमचे पोषण करण्याची जबाबदारी सरकारची आहे का

शोषण करण्याची!... ही परिस्थिती लक्षात घेता आता उगा उगारायलाचं हवा शेतकऱ्यांनी आसूड!.... ही परिस्थिती जर बदलायची असेल. तर सर्व शेतकऱ्यांनी, भूमिपुत्रांनी एकसंघ होण्याची गरज आहे....

आता उठवू सारे रान
आता पेटवू सारे रान

शेतकऱ्यांच्या न्याय
हक्कासाठी लावून प्राण प्रणाला प्राण!
अन्नदाता सुखी भव:....

**मनोज संजय भगत**
एम.ए प्रथम वर्ष राज्यशास्त्र विभाग

---

## जातीभेद

या जातीचा त्या जातीला काय एवढा राग आहे
सूर्यप्रकाश कुणाला स्वस्त आणि कुणाला महाग
आहे जातीभेदाचे विष घेऊनी डसतो अहंकाराचा नाग
आहे झोपलेत का इथे सगळे सांगा कोणाला जाग
आहे जाती धर्माच्या नावाने पेटवी तो कोण आग
आहे जळते यात कुणाचे कातडे पांघरून फिरतो
कोल्हा तो का खरा वाघ आहे! हाती काही लागणार
नाही मृगजळाचा पाठलाग आहे जातिभेदाच्या
पुरस्कार येथे माणवतेचा केला त्याग आहे
माणुसकीच्या शुभ वस्त्रावर पडला हा काळा डाग
आहे

मधुसूदन गो. ढोरे
एम.ए.मराठी 2

---

## जग हे विश्वावर चालतं...!

जग हे विश्वासावर चालतं हे आपण खूप आधीपासून ऐकत आलेलो आहे आणि ते काही अंशी बरोबर सुद्धा आहे. कारण . काही अंशी म्हणायचं कारण आहे की हल्ली विश्वास हा काही अंशी च उरलाय. विश्वासाच्या पाठीमागे अविश्वास सुद्धा लागूनच आहे आणि अलीकडे तो जरा जास्तच वाढत आहे . आयुष्याच्या पातळीवर स्वतःशी प्रामाणिक असन खूप महत्वाचं असतं. कारण माणूस हा समाजाचा महत्त्वाचा घटक आहे आणि सहाजिकच माणसाच्या वागणुकीचा परिणाम प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष समाजावर होत असत. खर तर थेट परिणाम होतो असं म्हंटले तर वावग ठरणार नाही. बघा , जीवन जगत असताना बरेच हौशे-नवशे _माफ करा शब्द आपणाला काहीशे वेगळे वाटतील _ म्हणजे

वेगवेगळ्या विचारांचे भेटतात त्यांचा , त्यांच्या त्यांच्या विचारांचा काही अंशी परिणाम हा आपल्यावर होत असतो सहाजिकच आहे भाषा ही विचारांच्या देवाण-घेवाण नीने प्रगल्भ बनत असते. अर्थात त्या त्या व्यक्तीची वैचारिक पातळी सुद्धा तेवढी पट्टीची पाहिजे ... पट्टीची म्हणण्यापेक्षा ती कुठल्यातरी रीतीने परिणामकारक असली पाहिजे . जशे की बाबा आमटे यांच्या जीवनशैलीचा गौरव करण्यात आला तो त्यांच्यातल्या मासुपणाला आणि त्यांच्यातल्या प्रामाणिक प्रयत्नांना सलाम होता आणि त्यांच्या जीवनशैलीचा परिणाम किंवा आदर्श माणसाच्या आयुष्यावर होतो किंवा लोक घेतात तसंच परिणाम एखाद्या वाईट व्यक्तीच्या वागणुकीचा सुद्धा परिणाम होतो आणि त्याचा समाज पातळीवर विचार करण वा त्यामध्ये बदल घडून आणला गरजेचा आहे. आता माणसात बदल घडविणे कुण्या दुसऱ्याच्या हाती नसत हे खरे मात्र शालेय संस्कार कौटुंबिक संस्कार प्राथमिक संस्काराच्या बाजू माणसाचं वैचारिक जीवन घडवत असतात आणि त्या अशा रीतीने माणूस माणसाचे विचार आणि समाज ह्या गोष्टी जोडलेले आहेत आणि इथेच आपल्या असं लक्षात येतं की विश्वास माणूस आणि प्रामाणिकपणा ह्या सगळ्या गोष्टींचा गुंता कसा असा सहज वाचतांना आपल्या दिसतोय आणि आज त्या गोष्टीत चा प्रकर्षाने विचार करणे गरजेचे आहे असे माझे ठाम मत आहे ज्ञानेश्वर महाराज एका ठिकाणी आपल्या ओळीमध्ये म्हणतात जग धावतंय पण आडराने , "आडरानी भरले जग झाडू संतांचे मार्ग"

ही बाब कुणाला क्षुल्लक तर कुणाला एवढी महत्वाची नाही वाटणार परंतु आपण आज सूक्ष्म ती सूक्ष्म पासून ते स्थूलपने विचार केल्यास लक्षात येईल की जगात आज माणूस , माणूस म्हणून शिल्लक उरलाच नाहीये तो नुस्त प्रॅक्टिकल झला आहे . हो .. माणसाने प्रॅक्टिकल असावं परंतु माणुसकीला काळीमा फासला जाईल येवढे ही नाही हो..! नाहीतर जे माणुसकीच्या तत्वावर उभे आहेत ते खचून जातील . गोंधळून जातील की आपलं प्रामाणिक असणं चूक की बरोबर . आणि हल्ली तेच होत आहे जे ज्यांना समाजाचे सामाजिक तत्वाचे काही ऐक घेणे नसते ते निढल
पणे जगतात आणि माणुसकी तत्वावर जगतात त्याचा तोटा होतो . कारण असे व्यक्ती खूप विचार करतात. आणि परिणामी मायेग्रेन सारखे आजार उभे राहतात .बघा माणसाच्या वागणुकीचा थेट सामाजिक पातळीवर कसा परिणाम होते ( कारण समाज हा माणसांनीच बनतो ना ) माणसाच्या वागणुकीचा परिणाम हा समाज पातळीवर होत असतो मात्र आज याच सारख्या महत्त्वाच्या गोष्टीवर मुद्दाम दुर्लक्ष केले जात आहे कारण प्रत्येकाला असं वाटतं की हे जे ज्ञान आहे ना ते त्याच्या साठी आहे ये म्हणतात ना ' संत जन्मावा पण शेजारी...!
सामजिक पातळी ही मानसिक पातळीवर अवलंबून आहे असे माझे ठाम मत आहे. जेव्हा माणूस आपली मानसिक पातळी उंचावेल तरच समजला सामजिक समस्यांवर मात करता येईल .थोडक्यात काय तर जीवन जगत असताना माणूस माणसाची तत्वे आणि विश्वास हा खरच खूप महत्वाचा विषय आहे

आणि या गोष्टीचा प्रकर्षाने विचार होणे गरजेचे आहे असे मला वाटते

पूजा महादेव परिशे
एम .ए मराठी भाग -२

---

## पर्यावरण

आज आपल्याला पर्यावरणीय समस्या भेडसावतांना दिसत आहे. पर्यावरण म्हणजे आजूबाजूचा परिसर ज्यात जंगल, नद्या ,डोंगर ,पठार, पंठारीचा भाग ,वन्य प्राणी , समग्र सृष्टीचा समावेश होतो. आज पर्यावरणाचा समतोल ढासळलेला आहे आपण त्याविषयी फार सजग आहो असे वाटत नाही.आंतरराष्ट्रीय स्तरापासून तर राष्ट्रीय राज्य स्तरावर वेगवेगळे उपक्रम राबवले जात आहेत. पण तरीही जागतिक तापमान वाढ ,अवर्षण, पावसाची अनियमितता ,
ही कारणे शोधणे गुंतागुंतीचे होत आहे.

आपल्याला खरंच जर पर्यावरणीय संतुलन राखायचे असेल तर प्रत्येकाने झाडे लावली पाहिजे झाडे जगवा झाडांचे संगोपन करा ही संकल्पना सर्वांनी अवलंबली पाहिजे. आज या दुष्टचक्रातून शेतकऱ्यांची ससेहोलपट होत आहे पावसाच्या अनिश्चिततेमुळे उत्पन्नाचा चा प्रश्न निर्माण होत आहे.

म्हणून प्रत्येकाने सतर्क राहून ह्या समस्या दूर करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे शासनाने कितीही मार्गदर्शक सूचना दिल्या तरी त्याचे पालन सर्व सतरा कडून झाले पाहिजे तरच पर्यावरणाचा समतोल राखला जाऊन पृथ्वीचे नंदनवन होऊ शकते.

योगिता जुमळे
एम.ए. मराठी भाग 2

---

## आयुष्यातील वडिलांची भूमिका...!!

मी एवढी मोठी नाही कीं, वडिलांची आयुष्यातील अविस्मरणीय भूमिका शब्दात व्यक्त करू शकेल किंव्हा मोजक्याच शब्दात त्यांना मांडू शकेल. माझ्या मते विश्वातील सारे शब्द जरी एकवटले तरी एका वडिलांची महती कोणीच एका चौकटीत बसवू शकणार नाही !

'बाप ' हा शब्द जरी लहान असला तरी त्याची कीर्ती मोजकीच नसते. त्यांच्यातील अर्पण आणि समर्पण या शब्दाने केवळ देणेच प्रतीत होते. प्रत्येक वडील हे केवळ आणि केवळ स्वतःसाठी नाही तर आपल्या कुटुंबाच्या आनंदासाठीच दिवस -रात्र झटत असतात. वडील झाल्यावर त्यांच्या खात्यात नेहमी कष्ट मांडलेले असते. असेच म्हणावे

लागेल. आपल्या मुलाबाळांच्या सुखासाठी त्यांना कुठल्या गोष्टीत कमी पडू नये म्हणून ते सतत परिपूर्ण होण्याचा प्रयत्न करत असतात. स्वतः च्या अंगावरचा सदरा जरी फाटला असेल तरी त्याला सुई दोऱ्याने जोडून ते दिवस काढतात पण कधी आपल्या स्वतः च्या मुलांवर फाटके कपडे घालण्याची वेळ येऊ देत नाही. घरची परिस्तिथी कशीही असो चांगली किंव्हा वाईट, तरीही स्वतःच्या सर्व इच्छा बाजूला ठेऊन हा ' बाप' नावाचा देवमाणूस आपल्या सर्वांच्या सुखाच्या शोधात त्याची दुप्पट मेहेनत पणाला लावतो ते ही कशाची अपेक्षा न ठेवता. त्यांचे कष्ट, मेहनत, दुःख, इच्छा, अपमान हे कोणालां न जाणवणारे असते. परंतु आजच्या पिढीला 'बाप ' फक्त्त एक पैसे कमावण्याचे साधन वाटतो आणि आज हे सांगतानाच खुप मोठी खंत होत आहे. आपल्या वडिलांचा आधार न बनता त्यांच्याच कष्टाने कमावलेल्या पैश्याचा गैरवापर करणारे आज आपण किती तरी जण पाहतो. वडिलांना आधार वाटणारा स्वतःचा मुलगाच त्याचा वैरी बनतो. पण या सर्वात एका 'बापाची कितपत चुक असते.? काहीही चूक नसून दिवसरात्र ज्याच्या संगोपनासाठी काबाडकष्ट केले तो च एक दिवस आपल्या जीवावर उठेल हे तर विचार करूनच अंगावर काटा उभा राहतो.

वडिलांच्या कष्टाचे मोजमाप तर करताच येणार नाही.
पण त्यांनी केलेल्या कामाचा आदर करून आपल्या कडून त्यांना कमीत कमी त्रास होईल असे तरी आपण नक्की वागू शकतो. परिस्तिथी हलाखीची असून सुद्धा आपल्या वडिलांची उपकारांची किंमत करून कष्टाचे सोने केलेले बरेच मुलं आपण पहिले आहेत. आणि आज अश्याच युवा पिढीची खुप गरज आहे.

आपल्या वडिलांकडून शिकण्यासारख्या खुप गोष्टी आहेत त्यांची परिवाराच्या सुखासाठी पाहायला मिळणारी धडपड, तहान भूक विसरून आपल्या ताटात आपल्याला मनासारखे अन्न मिळावे म्हनणून दिवसभर सोसावे लागणारे कष्ट, पैश्याच्या मिळकतीसाठी मालकाच्या हाताखाली होणारी पडझड, त्यांच्या कडून होणारा अपमान अश्या किती तरी गोष्टी जवळून अनुभल्यास आपल्याला खुप काही शिकवून जातात.

वडिलांसह ते उत्तम मित्र, तत्वज्ञ, मार्गदर्शनक, सोबती, रक्षक, गुरु अश्या कितीतरी भूमिका पार पाडत असतात.आपल्याला पडलेल्या प्रत्येक प्रश्नाच उत्तर त्यांच्याकडे सापडतेच. जबाबदारी च ओझं स्वतःच्या डोक्यावर घेऊन वडील फक्त आपल्या चेहेर्यावरील आनंदासाठी सर्वकाही सोसत असतात. आपल्या मुलांना कोणत्या गोष्टीत कमी पडू नये आणि त्यांच्या सगळ्या इच्छा पूर्ण व्हाव्यात हेच त्यांच्या ध्यानी मनी असते त्यांना अपेक्षा असतेस ती फक्त्त आपल्या कुटुंबाच्या साथीची. आपण त्यांच्या बद्दल थोडी जरी आपुलकी दाखवली कीं हीच काळजी त्यांना मायेची उब देऊन जाते. आपल्या मनातील इच्छा आपल्या ओठांवर येण्याआधीच आपले वडील त्याचा पाठलाग करत असतात.

आपल्याला परमेश्वराने दिलेली सर्वात सुंदर भेट म्हणजे आपले "आई - वडील". पूर्ण जग जरी एकीकडे झाले तरी ते आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे असतात. त्यांच्या असण्याने जी गोष्ट असते ती जागा दुसरे कोणीही भरून काढू शकत नाही. माझ्या मते जगातील सगळ्या गोष्टींना काही ना काही, कुठे ना कुठे सीमा असतात पण आई वडिलांच्या प्रेमाला कधीच सीमा नसते ते कधीही न संपणारे आणि अमर्यादित असते. ज्याप्रमाणे बाळाच्या जन्माच्या वेळी आईच्या सहनशीलतेला काही मर्यादा नसते ती शेवटच्या श्वासापर्यंत लढायला तयार असते त्याचप्रमाणे वडिलांच्या मायेला त्यांच्या प्रेमालाही कधीच मर्यादा आणि बंधन नसते त्यांच्या नजरेतून आणि बोलण्यातून फक्त्त आणि फक्त्त प्रेमच ओसंडून वाहात असते.......!!!!

**-अर्पिता अजित काळकोंडे**
**एम. ए (संगीत )द्वितीय वर्ष.**

---

## माहिती तंत्रज्ञान : काळाची गरज

स्लग- अत्याधुनिक शतकाकडे घोडदौडरूपी यशस्वी वाटचाल

आज सर्वत्र माहिती तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकांची भूमिका विद्यार्थ्यांचा मार्गदर्शक, सहयोगी व सहकारी अशी बदलल्याने आता शिक्षकाने निरनिराळ्या स्रोतांद्वारे विविध स्वरुपात असलेले ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे महत्त्वाचे आहे. सद्यस्थितीत माहिती तंत्रज्ञानाधारित धोरणामुळे अत्याधुनिक शतकाकडे घोडदौडरूपी यशस्वी वाटचाल होताना दिसून येत आहे, एवढे मात्र निश्चित. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी देखील अशा नवनवीन माहिती तंत्रज्ञान आत्मसात करणे नितांत आवश्यक आहे.

माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीने माहिती तंत्रज्ञान साक्षरतेस पुढाकार मिळालेला आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेटचा वापर वाढून इंटरनेटद्वारे विस्तृत प्रमाणात माहिती उपलब्ध झालेली आहे व सद्यस्थितीतही होत आहे. इंटरनेटच्या माध्यमातून व्यापक प्रमाणात उपलब्ध झालेल्या बदलत्या स्वरुपाच्या माहितीच्या साठ्याचे ज्ञानांत रुपांतर करून ते ज्ञान सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शिक्षकांनी पारंपरिक शिक्षण पद्धती बरोबर नवनवीन पद्धती विकसित कराव्यात.

शाळा-महाविद्यालयांमध्ये माहिती तंत्रज्ञानाधारित (ई-लर्निंग) शिक्षण पद्धतीचा अवलंब करून हे साध्य होऊ शकते. तसेच माहिती तंत्रज्ञानाधारित शिक्षण पद्धतीचा अवलंब केल्यास शिक्षकास अधिक कार्यात्मक भूमिका पार पाडण्याची संधी

मिळेल. उदाहरणार्थ मानवी जीवनचक्र विद्यार्थ्यांना समजविण्यासाठी सध्याच्या शिक्षण पद्धतीमध्ये फळ्यावर आकृती काढून किंवा वर्गामध्ये तक्ता नेऊन समजवावे लागते. या पद्घतीने विद्यार्थी फक्त अशाच गोष्टींचे आकलन करू शकतात की ज्या त्यांना समोर दिसतात. परंतु याचसाठी जर संगणकाचा किंवा उर्ध्व शीर्ष ध्वनिक्षेपकाचा अर्थात ओव्हर हेड प्रोजेक्टरचा वापर केला तर आत्मसात होणाऱ्या गोष्टींचे आकलन जलदगतीने करता येते. त्याचप्रमाणे एमएस पॉवरपॉईंट प्रेझेंटेशनचा उपयोग करून 2 डी आणि 3 डी इमेजेस, व्हीडिओ क्लिप्स आणि इंटरनेटवर उपलब्ध असलेली इतर अनुषंगिक माहिती विद्यार्थ्यांना सोयीस्करपणे देता येईल. तसेच या पद्धतीने शिक्षक विद्यार्थ्यांना संकल्पना अधिक प्रभावीरित्या स्पष्ट करू शकतील आणि विद्यार्थ्यांना दृक-श्राव्य माध्यमाद्वारे शैक्षणिक प्रक्रियेचा अनुभवदेखील घेता येईल. नवीन शैक्षणिक अनुभूतीसाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर कसा करता येऊ शकतो, याचे हे एक प्रतीकात्मक उदाहरण होय.

माहिती तंत्रज्ञान आधारित शिक्षण पद्धतीस पुढाकार देण्यासाठी शाळांमध्ये संगणकीय प्रयोगशाळांच्या निर्मितीसाठी तसेच शिक्षकांनी माहिती तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी शासकीय पातळीवरदेखील प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. यामुळे 21 व्या शतकाशी निगडित माहिती तंत्रज्ञानाधारित अभिनव शिक्षण पद्धतींचा वापर करण्यास समर्थ होतात. माहिती तंत्रज्ञानामुळे कौशल्ये आत्मसात करणे यावर भर देणे आज अत्यावश्यक बाब होऊन बसली आहे.

व्यावसायिक क्षेत्रातील वाढत्या स्पर्धेच्या युगामध्ये आ उपभोक्ता हा महत्त्वपूर्ण आणि उपभोक्ताहित हेच केंद्रबिंदू मानून सर्व ग्रंथालयीन धोरणे आखली जातात. वाढत्या माहितीच्या युगामध्ये माहितीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ई-लर्निंग, ई-जर्नल्स, इत्यादी हे ज्ञान संपादन करण्याचे एक सशक्त असे माध्यम ठरत आहे. यासाठी संगणक आणि इंटरनेट अशा माध्यमांचा समावेश असणे अत्यंत आवश्यक आहे. अशा माहितीमुळे उन्नती साध्य करण्यासाठी सर्वोत्कृष्ट आणि सक्षम उपभोक्ता सेवा उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे. उपभोक्ता हाच केंद्रबिंदू मानून ग्रंथालयीन ध्येयधोरणांची आखणी करण्याच्या नवीन व्यावसायिक पद्धतीस सध्या ग्रंथालयीन क्षेत्रामध्ये प्राधान्य देण्यात येत आहे. विविध प्रकारच्या वाचक, विद्यार्थी, ग्राहक, संशोधक, अध्ययनार्थी अशा अनेक गरजूंसाठी त्यांच्या वेगवेगळ्या स्वरुपाच्या नेमक्या गरजा जाणून, सेवेची जाण असलेल्या आणि संवाद कौशल्य असलेल्या कुशल मनुष्यबळाची व्यावसायिक संस्थांना तसेच ग्रंथालयांना आज प्रकर्षाने आवश्यकता आहे. ही खास कौशल्ये आत्मसात करण्यासाठी त्यांच्यामध्ये कौशल्ये असणे नितांत आवश्यक असते.

ई-लर्निंग प्रणालीमार्फत व्यक्ती अभ्यास (केस स्टडी), गटचर्चा, अध्ययन-अध्यापन,

सहयोगकर्त्यांशी संवाद व मूल्यांकन या बाबींचा सर्वसमावेशक अंतर्भाव असणे जरूरीचे असते. मोबाईल क्रांतीच्या उदयामुळे माहिती ही क्षणभंगूर होत चाललेली आहे. प्राप्त झालेली नवीन माहिती क्षणार्धात जुनी होत आहे. आज मोबाईलच्या माध्यमातून नेट सर्फिंग, ई-मेल, संदेशवहन, फेसबुक, व्हाटस् ॲप, इंस्टाग्राम, ट्विटर, टेलीग्राम आदी 3 जी आणि 4 जी गतीमुळे माहितीचे आदान-प्रदान सहज सोपे झाले आहे. जगाच्या पाठीवर कुठेही कोणतीही घटना घडल्यास लगेच अशा प्रकारच्या माहितीचे ताबडतोब प्रसरण होते. तसेच टेलीकॉन्फ्रेंसिंगमुळे चर्चासत्रे व परिषदांचेही आयोजन व्यापक प्रमाणात होताना दिसून येत आहे. त्यामुळे असे काही तांत्रिक घटकही समाजाभिमुख कार्य करण्यासाठी तसेच राष्ट्रोन्नती व राष्ट्रीय एकात्मता आणखी जोमाने वर्धनशील होण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोनातून कारणीभूत ठरत आहेत. एकंदरीत इलेक्ट्रॉनिक साधनसामुग्रीचा वापर प्रत्येक क्षेत्रात झपाट्याने होत आहे. अशा या तंत्रज्ञान व तंत्रविज्ञानामुळे आजची पिढी विविधांगी मार्गांनी प्रगतिशील होत चालली आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

- मोनिष चौबे
M.A. (Hindi)

---

**ऑनलाईन शिक्षण : काळाची गरज !**

आपल्याला आपल्या आयुष्यात यशस्वी बनायचे असेल तर शिक्षण हे खूप महत्वाचे आहे. जगभर पसरलेल्या कोरोना विषाणूमुळे भरपूर महिन्यांनापासून वातावरण अस्थिर झाले आहे. वर्गामध्ये बसून शिक्षण घेत असताना विद्यार्थी व शिक्षक यांच्यामध्ये संवाद होत असायचा परंतु कोरोना संकटामुळे शाळा बंद ठेवण्यात आल्या. कोरोनाचे विषाणूंचा मोठे संकट जगभर असल्यामुळे मुलांना शाळांमध्ये जाऊन शिक्षण घेता येत नाहीये. कोरोना विषाणूमुळे मानवी जीवनात खूप बदल झाले. कोरोनाच्या संकटामुळे शाळा, कॉलेज, मंदिरे, गर्दीची ठिकाणे भरपूर महिन्यांपासून बंद ठेवण्यात आली आहेत. या जागतिक संकटामुळे काही काळासाठी शाळा, कॉलेज बंद करत असताना मुलांची काळजी घेणे हे महत्वाचे ध्येय होते. परंतु शिक्षण थांबवून कसे चालेल ? कोरोनाचे संकट जरी असले तरी मुलांचे शिक्षण थांबवून चालणार नाही. शाळा कॉलेज बंद ठेवल्यामुळे मुलांचे जास्त प्रमाणात शैक्षणिक नुकसान होऊ शकते. शाळा, कॉलेज बंद असल्यामुळे ऑनलाईन शिक्षण हा खूप चांगला पर्यायी मार्ग आपल्याकडे आहे. ज्ञान मिळवण्याच्या वेगवेगळ्या पद्धती उपयोगात आणणे गरजेचे आहे. कोरोना काळामध्ये ऑनलाईन ज्ञान आपण मिळवू शकतो.ऑनलाईन शिक्षण पद्धतीचा उपयोग खूप वाढताना आपल्याला पहायला मिळत आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे ऑनलाईन शिक्षण पद्धतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलताना आपल्याला पाहायला मिळत आहे.

ऑनलाईन शिक्षण का गरजेचे आहे हे आपल्याला या कोविड१९ च्या काळात समजण्यास मदत झाली. वेगवेगळ्या माध्यमातून विध्यार्थी हवे ते ज्ञान मिळवू शकतात. डिजिटल माध्यमांच्या द्वारे एकमेकांकडून ज्ञानाची देवाण घेवाण करू शकतात. आपल्याला शिकताना येणाऱ्या अडचणी एकमेकांना सांगून त्याचे उत्तर मिळवू शकतात. कोरोना काळामध्ये भरपूर ऑनलाईन वर्ग सुरू करून शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी संपर्क साधून त्यांना ज्ञान दिले. मुलांना चांगले शिक्षण मिळावे म्हणून शिक्षकांनी भरपूर प्रयत्न केले. ऑनलाईन पद्धतीमुळे शिक्षकांना विद्यार्थ्यांशी संपर्क साधता आला आणि त्या बरोबर पालकांशी ही संपर्क साधने सोपे झाले. वेळोवेळी ऑनलाईन माध्यमांच्याद्वारे मीटिंग घेऊन पालकांना विद्यार्थ्यांची प्रगती सांगता येऊ लागली आहे. विद्यार्थ्यांनी मोबाइल आणि लॅपटॉप यांचा वापर शिक्षण मिळवण्यासाठी केला तर खूप ज्ञान मिळवू शकतो. ऑनलाईन शिक्षण पद्धतीचे भरपूर फायदे आहेत. काही विध्यार्थ्यांना वर्गामध्ये बसून शिकायला आवडते, काहींना ऑनलाईन माध्यमातून ज्ञान मिळवायला आवडते. ऑनलाईन शिक्षणामुळे आपल्या वेळेची बचत होईल व आपल्याला शिस्त ही लागेल. आपल्याला अभ्यासासाठी लागणारे साहित्य सहज उपलब्ध होऊ शकते. वेगवेगळ्या माध्यमातून आपल्याला भरपूर माहिती मिळते. ऑनलाईन माहितीचा फायदा म्हणजे एखादी गोष्ट समजली नाही तर ती आपण परत परत पाहून ऐकून समजून घेऊ शकतो. ऑनलाईन विडिओ पाहून विध्यार्थी स्वतःच्या नोट्स स्वतः बनवू शकतात. ऑनलाईन शिक्षणाचा फायदा म्हणजे आपल्याला ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही ज्ञान देने सोपे होईल. पालकांनी जर आपल्या मुलांना वेळेचे नियोजन करून दिले तर ऑनलाईन शिक्षणाचे खूप फायदे होऊ शकतात. पालनकांचेही मुलांवर लक्ष राहते. मुलांना योग्य मार्गदर्शन करून मोबाइल मध्ये शिक्षणसंबंधी व्हिडीओ डाऊनलोड करून दिले तर मुलांना शिकण्यात आवड निर्माण होईल. ऑनलाईन शिक्षण घेत असताना पालकांनी मुलांची काळजी घेणेसुद्धा गरजेचे आहे.जास्त वेळ मोबाईल, लॅपटॉप यांचा वापर झाला तर डोळ्यांना त्रास होऊ शकतो त्यासाठी पालकांनी मुलांना वेळेचे नियोजन करून देणे गरजेचे आहे. ऑनलाईन शिक्षणामुळे मुलांना शिक्षणात आवड निर्माण होते त्यामुळे आपण ऑनलाईन शिक्षणाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे.

कु. वैशाली तुलारामजी खोब्रागडे

**ब्रेक्स**

एकदा फिजिक्सच्या टिचरने मुलांना प्रश्न विचारला,
" कारमधे ब्रेक्स का लावलेले असतात ? "
त्यावर निरनिराळी उत्तरे आली,
थांबण्यासाठी
वेग कमी करण्यासाठी
अपघात टाळण्यासाठी
परंतू सर्वात चांगले उत्तर होते,
"जास्त वेगाने जाता येण्यासाठी..!!"
गोंधळले असाल ना अशा उत्तराने..... मग असे कसे..? जरा विचार करा.....!
जर तुमच्या कारमधे ब्रेकच नसते तर तुम्ही जास्तीत जास्त किती वेगाने गाडी चालवाल..? कारला ब्रेक आहेत म्हणूनच तुम्ही वेगाने गाडी चालवण्याचे धाडस करू शकता, तुमच्या इच्छित स्थळी पोहोचू शकता.

जीवनातही तुम्हाला आई वडील, सासु सासरे , कुटुंब इ. रूपात ब्रेक्स मिळतात. तुम्हाला वाटते की, ते तुम्हाला वेळोवेळी टोकतात , अडवतात, शंका कुशंका उभ्या करतात, तुमच्या मार्गात अडथळे आणण्याचे काम करतात. म्हणून तुम्ही त्यांच्याविषयी चिडचिडे होतात.
परंतु लक्षात ठेवा, जीवनात वेळोवेळी आलेल्या अशा ब्रेक्समुळेच तुम्ही आज आहे ते स्थान मिळवू शकला आहात. असे ब्रेक्स नसते तर तुम्ही कुठतरी भरकटला असता, अपघातात किंवा संकटात सापडला असता.
म्हणूनच जीवनात अधुनमधून येणाऱ्या अशा " ब्रेक्सची " जाण ठेवा.

धिरज म. खंडारे
एम. ए मराठी भाग-२

==================================================================

**लेख – हिंदी**

==================================================================

## एक स्वस्थ् व्यक्ति देश की प्रगति का सहायक

"स्वास्थ्य जीवन की अनमोल पुंजी है "

राष्ट्र निर्माण में, समाज के प्रत्येक व्यक्ति का एक अपना योगदान रहा है, हर नागरिक स्वस्थ् हो, और स्पष्ट दृष्टिकोण रखता है, तो वह समाज का आधार स्तंभ है | राष्ट्र की उन्नति के लिए आधार स्तंभ की नींव का सशक्त होना भी उतना ही जरूरी है| आज विश्व भर में जैसी परिस्थितियां है , उनसे हम भलीभाँति परिचित है |कोरोना जैसी आपातकालीन आपदा दौरान, अधिकतम (रोगीयों, गरीबों, मजदूरों) लोगों को सहायता की आवश्यकता होती है | शासन प्रबंधन

का तत्काल पहुँचना संभव नहीं है | इस प्रकार की स्थीती में, समाज आगे बढ़कर मदद करता है | इसलिए प्रत्येक व्यक्ति का, शारीरिक और मानसिक रूप से स्वस्थ रहना आज की प्राथमिक जरूरत है| जीवन एक यात्रा है , जिसमें प्रिय-अप्रिय घटनाओं का घटना
स्वभाविक है, जहाँ प्रत्येक अनुभव सुखद नही हो सकता | व्यक्ति की अन्य भौतिक आवश्यकताओं की ही तरह, स्वास्थ्य को प्राथमिकता दी जानी चाहिए| स्वास्थ्य के प्रति सकारात्मक दृष्टिकोण गंभीर रूपसे चिंतनकी जरूरत है |

(1) नियमित योग और ध्यान कर सकते हैं |
(2) पोषण युक्त आहार ले |
(3) संसाधनों का प्रयोग जरूरत पड़ने पर ही करें |
(4) अपनी रुचि के काम करे | जैसे:- पढ़ना, संगीत, बागबानी ,खेल कूद |

किसी अन्य की, आवश्यकता पड़ने पर की गई सहायता से, अपना आत्मविश्वास बढाएं | राष्ट्र की उन्नति, किर्ति में समाज की महत्वपूर्ण भूमिका होती है |

रेणु निरंजन जांगिड़
M.A.1yr (hindi literature)

---

## "हालात..."

कोरोना के दिन थे | लॉकडाऊन का समय थोडा काम हो चुका था |उसी समय कुछ नये नये तुफान देश में हडकंप मचा रहे थे | वैसे हमारे यहाँ उसका कुछ ज्यादा प्रभाव नहीं था, लेकीनं बेमौसम बारिश और तेज तेज हवाये चल रही थी | उसी बीच हमारे घर का पिछला हिस्सा तुफानी हवा से कमजोर हो गया, दिवार ढिली पड गयी, पिताजी ने सोचा इसे तुरंत ठीक कर दिया जाए नहीं तो घर कों काफी नुकसान हो सकता हैं | सब राजी हो गये, और घर बनाने वाले हमारे पुराने ठेकेदार से पिताजी ने संपर्क किया, वो मिलने आ गये और उस नुकसान वाले हिस्से कों देखकर पिताजी से पैंसो की यानी मजुरी किं बात किं, पिताजी ने कहा "ठीक हैं!" फिर काम किं शुरुवात हो गयी | ठेकेदार चाचा ने अपने साथ कुछ साथी लाये उनमे दो लोग थे, थोडी हीं देर में सिमेंट, गिट्टी, और बाकी सारी सामग्री आ पहुँची | तो उसे उताराने के लिए वही दो साथी लगाये थे | कोरोना और लॉकडाऊन किं दशा देखते हुए जितनी देर तक बाजार खुला रेहेता था, उतनी देरहीं हम सामान ला सकते थे, चिजों के दाम भी दुगने हो चुके थे | और हमारा काम भी बहुत बडा था | तभी उन दो साथीयो में से एक ने काम करने से इन्कार कर दिया, शायद उसके घरसे उसे कोई जरुरी काम के लिए बुलावा आया था|
दोनोमेसें अब एकही लडका बचा था | पिताजी कों दफ्तर से छुट्टी नहीं मिल पाई, लेकिन कोरोना किं वजह से उनका काम दो बजे तक हीं चलता था | 10:30 बज चुके थे, पिताजी माँ

कों सब समझाकर दफ्तर के लिए निकल गये | माँ और मैं बाहर काम देख रहे थे, और बडी बेहेन घर के अंदर थी | हम दोनो ने सोचा किं इतना बडा सामान उनमे आठसो इटा, सिमेंट के बॅग और बाकी इतना सामान ट्रक भरकर रेती, गिट्टी क्या ये अकेला अंदर लेकर जायेगा? माँ ने उन चाचा से पूछा, तो उन्होने हसकर जवाब दिया, "हाँ ! ये बडा काम का लडका हैं, उठा लेंगा वो सब सामान " और उसे आवाज दिया, "चलो गब्बर काम पर लग जाओ " वो दिखने में बडा हीं छोटा था| मैं और माँ उसके नामपर हस पडे कैसा नाम था उसका..... गब्बर !!!

गब्बर बडा इमानदार था | उसने धीरे धीरे करके सारा सामान जगह पर पहुंचा दिया | ट्रक से गिट्टी भी उतारी, हम सब देखते हीं रह गये | पहले हमे लगा ये बहुत छोटा लग रहा हैं, माँ बोली इतनी छोटी उम्र में इतना बडा काम? कैसें? तभी उसने पानी कीं मांग कीं मैंने उसे पानी दिया और वो पिने लगा | गब्बर बडा हीं बडबडा था, उसने माँ कों बोला "ठेकेदार चाचा केहेते हैं कीं मैं गब्बर जैसे काम करता हूं,फटाफट इसीलिये मुझे सब गब्बर हीं बुलाते हैं " वैसे 'आपका घर बडा हीं प्यारा हैं '! माँ मुस्कुराई !और उसे पूछा, 'क्या तुम इतनी छोटी उमर में काम करते हो? वो हसकर बोला, नहीं चाची मैं बीस साल का हूं, तो मैं बडा हूं ना ! माँ बोली अब तुम खाना खा लो ! ठेकेदार चाचा उनके दुसरे ठेके पर देखरेख के लिए चले गये थे | वो हाँ बोलकर वहाँ से चला गया ; सीढीयों के पिछे गुमसुम सा बैठा था ,बोहोत देर हो चुकी थी| माँ ने उसे पूछा, ' क्या तुमने खाना नहीं खाया? वो बोला नहीं मुझे भूख नहीं हैं ! लेकीनं माँ तो माँ होती हैं ना ! माँ ने उसकी सारी नाराजी और पेट में कीं भूख पढली और उसे कहा तुमने 'डिब्बा नहीं लाया तो केहे देते मुझे ! ' और उसे खाना दे दिया | पेहेले वो नहीं बोला शरमा रहा था, बादमे ले लिया | और बोलने लगा कीं आप दोनो जैसी मेरी बेहेना नहीं हैं !मेरे परिवार में मेरे माँ -बाबा और एक छोटा भाई हैं | मेरे माँ कीं कमर कीं हड्डी सरक चूकी हैं| उसे दर्दनाक तकलिफ होती हैं वो अपने बिस्तर से उठ तक नहीं पाती | डॉक्टर ने उसे ऑपरेशन कीं सलाह दी हैं | मुझें उसकी हीं तो फिकर हैं, लेकीनं बोला मुझे ईश्वर और मेरी मेहेनत पर पूरा भरोसा हैं | एक दिन मेरी माँ पूरी तरह से ठिक हो जाएगी , हैं न दीदी !हम मुस्कुराकर हाँ बोलें माँ ने पूछा पापा क्या काम करते हैं तुम्हारे? वो बोला "मजुरी" लेकीनं उन्हे शराब का भारी शौक हैं, और वो हमे मदद नहीं करते | मेरी माँ के ऑपरेशन के लिए पैसो के इंतजाम के लिए मैं ये सब काम करता हूँ |मेरा छोटा भाई पढं रहा हैं उसे काम कीं कोई आदत नहीं वो आलसी हैं ! घरके बर्तन से लेकरं खाने तक सब काम मैं हीं करता हूं ज्यादा कमाई के लिए काम के चक्कर में मैं खाना लाना भी भूल जाता हूं !

हम दोनो बेहेना सोचं में पड गयी कीं कैसें किस्मत हैं उसकी

यहा हम छुट्टीयों के मजे ले रहे हैं, और वो हैं कीं दिनरात काम किए जा रहा हैं | लगातार तीन दिन हमारे यहाँ काम चालू था | रोज वो जितना कमाता था, उसमे से माँ कीं दवांईयां खरीदता था |भलेही वह एक साधारण मजदूर था लेकीनं उसके सपने बडे थे | काम करते -करते वो हमसे  बांते करता था | उसकी स्कुल ना जाने कीं वजह बताता था | यह काम करना उसकी मजबुरी थी | जब हमने उसे पहेली बार देखा तो उससे बात करने कीं इच्छा बिलकुल भी नहीं हुई शायद मजदूर कीं ओर देखने का हमारा नजरीयां हीं गलत था | माँ ने हमे समाझाया कीं हर इन्सान अपनी जरूरतो के लिए हीं  काम करता हैं फिर चाहे वो कोई भी काम क्यूँ ना वो लेकीनं वो छोटा नहीं होता | उसका काम भलेही कैसा भी क्यूँ ना हो पर उसका उद्देश अच्छा हीं हैं |

तीन दिन बित गये| काम पूरा हुआ, उस दिन भारी काम कीं आदत ना होने से उसे बुखार चढ गया था | लेकीनं, उसकी एक आदत थी, वह बहुत ज्यादा गुटखा खाता था| माँ ने और हम दोनो बेहनोने मिलकर उसे खूब समझायां कीं गुटखा खाने से मूंह का कँसर यानी कर्करोग हो सकता हैं | और उसके बुरे असर कों  तुम सोच भी नहीं सकते, और उसके इलाज कीं किमत तुम कभी चुका भी नहीं सकते, लेकीनं वह नही समझा !फिर उसे कुछ उदाहरणं दिये लोगो की दुर्दशा बताई और कहा कीं "भैय्या ! आपको आपके माँ कीं फिकर हैं ना? उनके लिए आपको बहुत कुछ करना हैं ! अगर आपको कल कुछ हो गया तो?  माँ क्या करेगी?  उसका आपके सीवा इस दुनिया में कोई नही हैं | मेरी माँ ने डाटडपेटकर और थोडा प्यार से भी उसे सामाझाया तो वह रो पडा | और केहेने लगा कीं "मेरी माँ ने भी मुझे उसकी सौगन डाली हैं कीं तू गुटखा खायेगा तो मेरा मरा हुआ मुहं देखेगा, लेकीनं ये आदत मुझपर हावि हो गयी | मैं दिन में 10से 12 पॅकेट गुटखा खाता हूं शर्मिन्दगी से उसने कहां | तो माँ बोली यानी रोज तुम 60से 70 रुपीए इस जानलेवा गुटखे पे खर्च करते हो इतने सालो से अगर वो पैसे इकट्ठा किए होते तो आज तुम्हारी माँ शायद चल पाती ! उसकी आँखे जैसे खुल सी गयी उसने बोला कीं "मैं कलसे एक भी गुटखा ना खाने कीं कोशिश करुंगा उसकी जगह मैं कोई अच्छी आदत लगाऊंगा " वो उस बाद बोला " मैं पेहेले सिगारेट यानी धूम्रपान करता था, लेकीनं आप जैसे हीं अच्छे लोगोने मुझे समझायां और मैंने वो आदत छोड दी | और वैसेही मैं ये भी आदत छोड दूंगा | और दिन रात मेहेनत करके माँ के सारे सपने पुरे करने कोशिश करुंगा | आखिर मुझे जिना हैं मेरी माँ के लिए ! और वो चला गया | वो दो तीन लोगोका काम अकेला हीं करता था,  ताकी ज्यादा पैसे पा सके | हमे क्या पता था, कीं वह ये आदत छोडेंगा भी यां नही !लेकीनं किसीको गलत मार्ग से बचाना अच्छा होता हैं | देड महिने बाद वो  वापीस आया, हमारा घर धुंडते | उसने आवाज लगाई, "चाची ! दीदी !! कोई हैं क्या घरपे मैं हूं गब्बर !"

हमे लगा ये कैसें आ गया शायद मिलने आया होगा, माँ ने उसे घरमे बुलाया तो वो केहेने लगा शुक्रिया !!!! दोनो हाथ जोडकर बोला " चाची मैं आपका बहुत बडा शुक्रगुजार हूं ! जैसे हीं आपने मुझे समझाया मैंने ये आदत छोड दी मेरे लिए ये थोडा मुश्किल था लेकीनं नामूमकिन नही ! जब भी मुझे गुटखा खाने कीं इच्छा होती तो मुझे आपकी वो सारी बाते याद आ जाती | ऐसे हीं आप सब लोगोकी दुआओसे मेरी माँ का ऑपरेशन एक सरकारी अस्पताल में करवा दिया | अब मेरी माँ ईश्वर कीं कृपा और आपकी प्रार्थना से चल सकती हैं इससे बडी ख़ुशी कीं बात मेरे लिए क्या हो सकती हैं | मेरी गुटखा खाने कीं आदत छुट गयी इसलिये माँ बहुत खुश हैं! " और हम सब खुश हुए पिताजी भी घरपर थे | उन्होने और माँ ने उसे आशीर्वाद दिया कीं ऐसेही अपने माँ के सारे ख्वाब पुरे करना और वह खुश हो कर लौट गया|

हमे इस बात कीं ख़ुशी हैं कीं हमने उसे मौत के कुए में जाने से रोक लिया किसकी जिंदगी बचाई अज्ञान और गरिबी के घोर अंधकार कीं चपेट में आकर आज हजारो लोग बिगड रहे हैं ! उसकी जिंदगी बरबाद होने से बच गयी | माँ के प्यार और आंचल ने उसे भी जिने कीं राह दिखाई |

कितने आजिब होते हैं ना ये "हालात" भी! जों जिने के लिए मरने तक कों भी सारी हदे पार कराते हैं | इन्ही हलातों कीं वजह से वह सिख नहीं पाया, लेकीनं हालातों ने हीं उसे सबकुछ सिखा दिया | वह बडा इन्सान नही बन सका मगर "अच्छा इन्सान जरुर बन गया" |

कु. मानसी अजित काळकोंडे.
बी. ए प्रथम वर्ष

---

# संस्कृत - लेख

---

## कालिदासमेघदूते निसर्गसौन्दर्यवर्णनम्

आषाढस्य प्रथमदिवसः येन चिरन्तनः अमरः च अक्षयः च कृतः न केवलं संस्कृतवाङ्मये अपितु सकलविश्वसाहित्ये महाकविकालिदासस्य निसर्गसौन्दर्यवर्णनं केवलम् अपूर्वमेव। कविकुलगुरुकालिदासस्य अमरदूतकाव्यम् मेघदूतम् अस्ति। कालिदासस्य कृते मेघः न केवलं धूमज्योतिः सलिलमरुतां व्यतिकरः एव। तस्य मतेन अयं मेघः अभिजातकुले भुवनविदिते पुष्करवर्तकानां कुले जातः अस्ति। अपरं च सः मघोनः कामरूपः प्रकृतिपुरुषः। अतः एव यक्षः मेघं सन्देशवहनार्थं प्रार्थयते। अतः कालिदासस्य यक्षः मेघं स्तुयते

याञ्चा मोघा वरमधिगुणे नाधमे लब्धकामा ।

आषाढस्य प्रथमदिवसे आश्लिष्टसानुं वप्रक्रीडा परिणतगजप्रेक्षणीयं मेघं दृष्ट्वा तस्मै प्रत्यग्रैः कुटजकुसुमैः अर्घं कल्पयित्वा यक्षः स्वागतं व्याहरति । तदनन्तरमेव अलकानगरीं गत्वा तस्य प्रियायै सन्देशकथनार्थं कथयति। मेघस्य प्रवासस्य आरम्भः कथं सुखकरः स्यात् इति कथयितुकामः सः लिखति -

मन्दं मन्दं नुदति पवनश्चानुकूलो यथा त्वां
वामश्चायं नदति मधुरं चातकस्ते सगन्धः।
गर्भाधानक्षणपरिचयात् नूनमाबद्धमालाः
सेविष्यन्ते नयनसुभगं खे भवन्तं बलाका ।।

